प्रकरण पाचवे

# 'बारोमास' मधील सामाजिक सांस्कृतिक जीवनदर्शन आणि वाङ्मयीन सौंदर्य

# प्रकरण पाचवे

# 'बारोमास' मधील सामाजिक, सांस्कृतिक जीवनदर्शन आणि वाङ्मयीन सौंदर्य

## ❖ प्रास्ताविक : -

साहित्य हा समाजाचा आरसा असतो आणि साहित्यातून वास्तव समाजाचे प्रतिबिंब उमटत असते. लेखक हा सभोवतालच्या समाजाचे निरीक्षण करून समाजातील वास्तव कलात्मकतेने कादंबरीत रेखाटत असतो. सामाजिक जीवनचित्रणामुळे त्या त्या प्रदेशातील चाली–रीती, संस्कृती यांचे दर्शन घडते. 'बारोमास' या कादंबरीतून विदर्भातील एका खेडयातील सामाजिक तसेच सांस्कृतिक जीवनदर्शन घडविले आहे. 'बारोमास' ही कादंबरी वाङ्मयीन दृष्टीनेही सकस ठरली आहे. येथे तिच्या वाङ्मयीन सौंदर्याचा शोध घ्यावयाचा आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण 'बारोमास' मधील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा विचार सामाजिक जीवनदर्शन विषमाधिष्ठीत समाजव्यवस्था, सांस्कृतिक वारसा जपण्याची तळमळ, 'बारोमास' चे वाङ्मयीन श्रेष्ठत्व या मुद्यांच्या आधारे करावयाचा आहे.

## ❖ 'बारोमास' मधील सामाजिक जीवनदर्शन : -

'कादंबरी' वाङ्मयनिर्मिती प्रारंभापासून आजपर्यंत कादंबरीने विविध टप्प्यातून प्रवास केला आहे. नवनवीन वाटा चोखाळल्या आहेत. कादंबरी वाङ्मय निर्मितीच्या मधल्या टप्प्यातील कादंबरी अधिक मनोरंजनवादी आणि करमणुकीचे साधन म्हणून अत्यंत लोकप्रिय झाली. हळूहळू काळ बदलला, समाज परिवर्तन झाले तसे कादंबरीचे स्वरूपही बदलू लागले. साहित्य आणि समाज एकमेकांशी निगडित असतात तेव्हा समाजात घडत असणाऱ्या घटना, काही प्रसंग कादंबरीचा विषय होऊ शकतात असा एक नवविचार मराठी साहित्यामध्ये रूढ झाला. हळूहळू मनोरंजनवादी कादंबरीत वास्तवता दिसू लागली आणि ही वास्तवता ग्रामीण वास्तवतेच्या रूपाने कादंबरीत प्रकट होऊ लागली. आजच्या काळात ग्रामीण साहित्यकारांनी ही वास्तवता कलात्मक दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. समाजातील विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न हे साहित्यकार करत आहेत. असाच एक प्रयत्न प्रा. सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' या कलाकृतीच्या माध्यमातून केलेला दिसून येतो.

'बारोमास' या कलाकृतीमधून लेखकाने ग्रामीण समाजजीवनाचे यथार्थ

चित्रण केले आहे. ग्रामीण समाजातील प्रत्येक घटनांवर, समस्यांवर प्रकाशझोत टाकलेला आहे. ग्रामीण समाजवास्तवाचे चित्रण त्याचबरोबर शहरीजीवनाचेही चित्रण यात आले आहे.

'बारोमास' मध्ये एक खेडं, खेडयातील एक शेतकरी कुटुंब, निसर्गाची कृपा - अवकृपा, शेतकऱ्यांच्या जीवनातील सुख - दु:खे लेखकाने अत्यंत सामर्थ्याने पेललेली दिसून येतात. 'सांजोळ' या खेडेगावाच्या रूपातून संपूर्ण खेडेगाव जिवंतपणे लेखकाने साकारले आहे.

विदर्भातील 'सांजोळ' या गावातील कास्तकार समाजाच्या कृषिजीवनाचे कठोर वास्तव जीवनाचे चित्रण चित्रित केले आहे. तेथील निसर्ग, परिसर, समाज, शेती, सुगी, दुष्काळ, दु:ख, दारिद्र्य, रूढी, परंपरा, सण, उत्सव, श्रध्दा, अडाणीपणा, अंधश्रध्दा, त्यांचे आचार - विचार, समजुती यांना शब्दांच्या माध्यमातून जिवंत करण्याचे प्रयत्न लेखकाने केले आहेत. व्यक्तींच्या जीवनातील चढउतार शब्दांकित केले आहेत. या ग्रामीण समाजजीवनाचा अधिक गांभीर्याने वेध घेतलेला आहे. मानवीसंबंध गुंतागुंतीचे असतात याचीही जाणीव करून दिली आहे.

आधुनिक काळाच्या रेटयामुळे आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, भांडवलशाही या सर्वांमुळे आज खेडेगावात असंख्य नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषत: शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत कष्टप्रद झाले आहे. 'सांजोळ' या खेडेगावातील एका शेतकरी कुटुंबाची झालेली वाताहत, सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या जीवनाची झालेली परवड, ग्रामीण स्त्रियांचे दु:ख, शहरी स्त्रीची ग्रामीण जीवन जगताना मनाची झालेली घुसमट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, राजकारण, याशिवाय दु:ख आणि दारिद्र्याशी झगडत असणाऱ्या संपूर्ण ग्रामीण समाजजीवनाचे चित्र लेखकाने अत्यंत भावस्पर्शी पध्दतीने वर्णिले आहे असे म्हणता येईल.

शेतकरी, निसर्ग आणि शेती यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो. शेतीशिवाय शेतकरी ही कल्पना करणेच अशक्य आहे. कास्तकार लोकांचे आपल्या शेतीवर अतोनात प्रेम आहे. ते आपल्या शेतीला 'काळी आई' मानतात, तिची पूजा करतात. कारण शेतकऱ्याचे सारे जीवन शेतीवर अवलंबून असते. शेती ही शेतकऱ्याच्या जीवनाचा केंद्रबिंदू असते. शेतकऱ्याचे जीवन निसर्गनिष्ठ असते. शेतीची सुगीच्यावेळी पूजा करतात. मशागत करून पिके घेतात, धान्योत्पादन काढतात. पण हा शेतकरी आज निसर्ग, व्यापारी, बाजारपेठा या चक्रव्युहात पूर्णपणे सापडलेला आहे. दिवसेंदिवस निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी कंगाल होऊ लागला आहे. तरीही या शेतकऱ्याचे पाय काळया मातीतच रोवून बसलेले आहेत.

सुभानरावांसारखा हाडाचा कष्टाळू शेतकरी या शेतीच्या ध्यासापायी आपले जीवन संपवून टाकतो. शेतकरी हा रात्रंदिवस कष्ट उपासत असतो तरीही त्याच्या आयुष्यात त्याला सुख लाभत नाही. शेतकऱ्याच्या दारिद्रयाचे चित्र त्याच्या घराकडे पाहताच कळून येते. शेतकऱ्यांची घरे म्हणजे माळोदाची, भिंतीला तडा गेलेली, माडीच्या किलचनातून बुळबुळ माती पडते. घरापाठीमागेच गुरांचा गोठा असतो. गुरांच्या गोठयात दावणीला गुलब्या - पुण्या, सुकऱ्या - बावऱ्या, पुतनी गाय, गबताळी चंपी म्हैस इ. प्राणी बांधलेले असतात. ग्रामीण भागात माणसांइतकेतच प्राण्यांना महत्त्व असते ते या कुटुंबाचेच एक घटक म्हणून वावरताना दिसतात. उदा. चंद्री मांजर, 'दमडया' नावाचा कुत्रा. या शेतकऱ्याचे पाळलेल्या प्राण्यांवर जिवापाड प्रेम असते पण दुष्काळ पडल्याने गोठयातील गाय व म्हैस विकावी लागते. या सर्व प्राण्यांची ताटातूट होते. तेव्हा शेतकऱ्याच्या व त्याच्या पत्नीच्या (सुभानराव व शेवंतामाय) डोळयातून अश्रू वाहतात. याविषयी लेखक लिहितो, 'शेवंतामाय भाकरतुकडा ओवाळून गायी - म्हशीच्या कपाळाला कुंकू लावून पूजा करीत होती. अन् डोळयांतून आसवं गाळत होती. ते पाहून सुभानरावांच्या डोळयांतही आसवं दाटाळून आली."[१] येथे शेतकऱ्याचे आपल्या प्राण्यांवर असलेले प्रेम दिसून येते.

दुष्काळामुळे गावातील बांधावरील सर्व झाडे तोडावी लागतात. त्यामुळे गाव, शेतशिवार ओसाड बनून जाते. सर्व पक्षी मरून जातात सारे गाव भकास दिसते.

शेतकरी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी खूप खास्ता काढतो. एका कपडयावर राहतो. त्याची पत्नीही दोन लुगडयाचे धडुते जोडून मोठे लुगडे तयार करून नेसते. इतकं दरिद्रीजीवन त्याच्या वाटयाला आलेले असते. शेतकरी कायम दारिद्रयात खितपत पडलेला दिसून येतो. त्याच्याकडे सतत आर्थिक टंचाई भासते त्यामुळे घरात किराणामालसुध्दा पुरेसा नसतो. शिवाय स्वयंपाकासाठी लागणारे सरपणही पुरेसे नसते. शेवंतामाय सूर्यफुलाच्या होळग्यावर स्वयंपाक करताना दिसते. ती घरातील सर्व कामे करून शेतात मजुरी करणाऱ्या बायकांसोबत जात असते. पण तिची सून असल्यानंतर मात्र ती इकडची काडी तिकडेसुध्दा करीत नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की ग्रामीण भागात सून घरात असल्यावर सासू काहीच काम करीत नसते. अशी परंपरेने चालत आलेली पध्दत असते. कोणताही सणवार आला तरीसुध्दा शेतकरी नवे कपडे घेऊ शकत नाही. शेतकऱ्याच्या अंगावर मळके, फाटके कपडे असतात. दिवसभर शेतात काम करणारा शेतकरी सकाळी न्याहरी भाकरी, चटणीचा भसका आणि तोंडी लावायला खाराची फोड घेतो. नैसर्गिक ऋतुचक्राबरोबर शेतकऱ्याचे नाते

जुळलेले असते. या ऋतुमानानुसार शेतकरी शेती पिकवत असतो. याचे सारे चित्र लेखकाने तपशीलवार उलगडून दाखवले आहे.

उदा.

१) 'रोहिणी नक्षत्राच्या पहिल्याच चरणात असा धडाकेबाज पाऊस झाला आणि शेतकऱ्यांच्या काळजात धडकी भरली. ज्यांची उन्हाळभरणीची कामं झाली होती ते पेरणीच्या जुळवा - जुळवीला लागले.'[२]

२) 'रोहिणी नक्षत्राच्या पहिल्या चरणात ओझरती भेट दिलेला पाऊस मृग नक्षत्राच्या पहिल्याच चरणात दोन - तीन वेळा दम खाऊन कोसळला. उरल्यासुरल्या भुईभेगा साफ झाल्या. शेतरानातले बांधबंधारे भरून वाहताना दाब सहन न होऊन पोटातून उसवले. झाडेझुडपे नितळकंच दिसू लागली.'[३] ऊन, वारा, पाऊस, झाडे झुडपे, नदी नाले यांच्याशी नित्यसंबंध असतो. शेतातील सुगी, पेरणी, निंदणी, कापणी, मळणी, औत - अवजारे, जनावरांची खरेदी विक्री ही सारी ग्रामीण भागातील महत्त्वाची कामे असतात. याचाही उल्लेख लेखकाने अत्यंत समर्पकपणे केलेला दिसून येतो.

कास्तकार शेतकरी पैशाने गरीब असले तरी मनाने श्रीमंत असतात. अडीअडचणीच्यावेळी एकमेकांच्या मदतीसाठी त्वरित धावून येतात. शंकरतात्यासारखी वडिलधारी व्यक्ती एकनाथाच्या कुटुंबासाठी मानसिक आधार देताना दिसते. येथे 'माणुसकीचा झरा' आठलेला नाही. असे म्हणावे लागेल.

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजाही हे गरीब शेतकरी पूर्ण करू शकत नाहीत. त्याची सतत ओढाताण होत असते. म्हणून ते सावकाराकडून कर्ज काढतात. त्या कर्जाची परतफेड न झाल्याने कर्जाचा महापूर येतो आणि शेवटी रावसाहेबासारखे कृषिनिष्ठ शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात आणि स्वत:चे जीवन संपवून टाकतात. परंतु प्रश्न सुटण्याऐवजी त्यांचा गुंता अधिकाधिक वाढत जातो याचाही विचार करणे गरजेचे वाटते.

ग्रामीण भागातील शेतकऱ्याची मुले नोकरी मिळत नाही म्हणून बेरोजगाराचे जीवन जगत असतात. एकनाथ एम्. ए. बी. एड., मधु कृषिपद्विका, मधुचे इतर मित्र कोणी आय. टी. आय, डी. एड. असे आहेत पण पैशावाचून कोणालाही नोकरी लागत नाही. म्हणून हे सारे तरूण एकत्र येऊन 'सोनेरी टोळी' निर्माण करतात. या टोळीतील सर्व तरूण गैरमार्गाला लागलेले आहेत. घरात चोऱ्या करतात, व्यसनी बनतात. कोणत्याही मार्गाने पैसा मिळवायचा असा विचार करणारी ही पिढी अंधश्रध्देच्या आहारी जाताना दिसते. 'बनुबा' सारख्या भोंदूगिरी करणाऱ्या बुवाच्या

नादी लागून सारे तरूण गुप्तधन शोधू लागतात. नोकरी मिळविण्यासाठी मधु शेत विकून मंञ्याचा वशिला असणाऱ्या दलालाला एक लाख रूपये देतो. त्यात मधु फसविला जातो. मग हाही मार्ग सोडून शेवटी हायवेवरील गाडया लुटण्याचा विचार सर्वजण करतात. कारण त्यांना चैनीत जीवन जगावे असे वाटत होते. 'एकनाथ' सारखा हुशार तरूण शेती व्यवसायाकडे वळतो त्यातही त्याला फारसे यश येत नाही. पती - पत्नीमध्ये वैचारिक संघर्ष होतो. पत्नी त्याला कायमचे सोडून जाते. व्यक्ती ही समाजाचा घटक असते. समाजासाठी आपण काहीतरी करावे. एक सामाजिक बांधिलकी म्हणून एकनाथ शेतकऱ्याच्या हक्कासाठी स्वत:ला वाहून घेतो. तो शेतकरी संघटनेत सामील होतो.

'सांजोळ' मधील ही माणसे साधी भोळी, श्रध्दाळू आहेत. महादेवावर त्यांची अपार श्रध्दा आहे. गावात कोरडा दुष्काळ पडतो. पाऊस केव्हा पडेल हे पाहण्यासाठी गावात प्रख्यात असणारे पंचागकरी 'तारूभटजी' यांच्या घरी सारे शेतकरी चकरा घालू लागतात. पण पाऊस काही पडत नाही. तारूभटजी आभाळाला शिव्या देत सोमेश्वर, पाताळेश्वर, पंचमुखी हनुमान या सर्व मंदिरात पूजापाठ करतात. गावदेवीला नवस करतात. गावात पाणीटंचाई असूनसुध्दा देवावरच्या श्रध्देमुळे सारी लहान, थोर, स्त्रिया दूरवरून पाणी आणून महादेवाच्या पिंडीवर अभिषेक करतात. मंदिरात लिंपण घालून जाळीच्या महादेवाची पिंड पाण्यात बुडवून ठेवतात. गावात धान्याची वर्गणी गोळा करून एकत्रित भंडारा घातला जातो. धोंडीचा प्रसाद म्हणून सर्वजण पंगतीत बसून खातात. प्रसादाला कोणी कमी मानू नये नाहीतर धोंडीदेवाला राग येईल श्रध्देपोटी अशी भितीही या माणसांच्या मनात निर्माण झालेली असते.

ग्रामीण भागात रीतीभातीला खूप महत्त्व असते. सासरहून माहेरी आलेल्या मुलीला रीतरिवाज म्हणून चोळी बांगडी घ्यायची परंपरा असते. पण ही रीतभात करण्याची मनात इच्छा असूनसुध्दा शेतकरी आपल्या मुलीसाठी पैशाअभावी काहीच घेऊ शकत नाही. याची खंत शेवंतामायसारख्या एका आईला वाटणे साहजिकच आहे. तिची ही इच्छा गरिबीमुळे मनात तशीच दबून राहते.

आपल्या समाजाने स्त्रियांसाठी काही नियम करून ठेवलेले असतात. या नियमानुसार तिचे वर्तन असावे असे सर्वांना वाटते. त्याविरूध्द स्त्रीचे वर्तन असले तर समाज तिला योग्य ते स्थान देत नाही. अशीच पूर्वापार चालत आलेली परंपरा ग्रामीण भागात दिसून येते. 'शेवंतामाय' ही समाजाने घालून दिलेल्या या चौकटीत वागत असते. पाया पडताना सुनेच्या डोक्यावर पदर असलाच पाहिजे असे तिला वाटत असते. पण शहरात वाढलेली सून अलका हिला हे रितरिवाज नाईलाजास्तव

स्वीकारावे लागतात. येथे जुन्या आणि नव्या विचारामधील दरी स्पष्ट केली आहे.

'बारोमास' या कलाकृतीत लेखकाने विविध समाजाचे दर्शनही घडविले आहे. वडारपुऱ्यातील वडारी दिवसभर बांधकामासाठी दगड फोडून पैसा कमवतात आणि रात्री हा पैसा दगडू महाकाळच्या गल्ल्यात दारूसाठी ओततात. बिडया ओढणारी, तंबाखू खाणारी ही माणसे सडकेवर पिऊन पडलेली असतात. ही माणसे आपापसात भांडत असतात.

समाजात विविध प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्ती आढळतात. या समाजात चांगल्या तशाच वाईट प्रवृत्तीच्या व्यक्ती असतात. 'बारोमास' या कलाकृतीतून सामाजिक जीवनाचे दर्शन लेखकाने या विविध प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखांच्याद्वारे घडविले आहे. या सर्व व्यक्तींच्या स्वभावातील विविधता लेखकाने बारकाव्याने टिपली आहे. नरूभाऊसारखा कृषिनिष्ठ पुरस्कार मिळालेला हाडाने शेतकरी असणारा उदात्तवृत्तीचा नि:स्वार्थीपणे सर्व शेतकऱ्यांवर प्रेम करणारा दिसतो. शेतकऱ्यासाठी स्वखर्चाने मेळावे घ्यायचे शेतकऱ्यांची परिस्थिती बदलण्याची त्याची मनापासूनची इच्छा असते.

दगडू महाकाळसारखी कपटी, कटकारस्थानी, स्वार्थी, सत्ताधारी माणसेसुध्दा या समाजात आहेत. साऱ्या गावावर त्याचा वचक असतो. एक प्रकारची दहशत असते. राजकारणाची सारी सूत्रे त्यांच्या हातात अस्तात.

आबाजी पवारासारखा वृध्द पारंपरिक कृषिपध्दतीचे महत्त्व पटवून देत असतो. त्याचे आड वळणाने बोलणे कोणालाही समजत नसे. स्वत:ला फार हुशार समजत असे. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात त्याचे चित्रण लेखकाने येथे केले आहे.

बळीमामासारखा गरीब शेतकरी सातबारा उतारा मिळवण्यासाठी तलाठयाकडे चकरावर चकरा मारत असतो. शासकीय अधिकारी या शेतकऱ्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणतीच सरकारी कागदपत्रे देत नाहीत. येथे समाजातील फोफावलेल्या भ्रष्टाचारी व निर्लज्ज अधिकाऱ्यांचे दर्शन घडते. सुरेश साठेसारखा दलाल अनेक सुशिक्षित तरूणांना नोकरीचे अमिष दाखवतो आणि उत्तम ठोकरेसारखा मंञ्याचा पी. ए. लाखो रूपये लुबाडून फरारी होतो. या भ्रष्टाचाऱ्यांचे हात मंञ्यांपर्यंत पोहचलेले असतात. समाजात अशा घटना घडल्या आहेत आणि आजही घडत आहेत.

मुगुटराव सारखा मजुरी करून पोट भरणारा मजुर हा शेतकऱ्यापेक्षा सुखी दिसतो. दिवसभर मजुरी करून रात्री टि. व्ही. पाहिल्याने मनाला आनंद मिळतो. या त्याच्या बोलण्यातून माणसाला श्रमानंतर थोडी तरी विश्रांती, करमणूक पाहिजे हे येथे

स्पष्ट होते. सव्वीस एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्यापेक्षा सालगडी म्हणून काम करणारा खंडया अधिक सुखी वाटतो.

कायद्याने स्त्रीला स्वातंत्र्य सुरक्षिततेचा हक्क प्राप्त झाला असला तरी आजच्या काळात स्त्री असुरक्षितच जीवन जगते. एकटी स्त्री दिसताच समाजातील टवाळ पोरांचे टोळके तिची छेड काढते. या सामाजिक प्रश्नावरही लेखकाने प्रकाश टाकलेला दिसतो.

ग्रामीण भागात आजही वैद्यकीय सेवा अपुऱ्या आहेत. एखादाच डॉक्टर त्या गावामध्ये असतो. मोरवाणी नावाचा डॉक्टर तेथे वैद्यकीय सेवा पुरवीत असतो. पण पैसे असले तरच हा डॉक्टर पेशंटला तपासतो. पैसे नसतील तर बॅग आवरून निघून जातो.

भामाबाईसारख्या ग्रामीण स्त्रीला भरपूर मुले आहेत. म्हणजे आजच्या २१ व्या शतकातही ग्रामीण समाजात भरपूर मुले असणारी कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगत आहेत. या गंभीर अशा सामाजिक प्रश्नावरही लेखकाने विचार मांडले आहेत.

शेतकऱ्याचा कळवळा असणारे तेजराव खपके शेतकरी संघटना निर्माण करतात. शेतकऱ्याच्या मागण्यासाठी उपोषण, चक्का जाम करतात. सतत शेतकऱ्यांसाठी लढा देणाऱ्या तेजराव तात्यांना संघटनेत फूट पडू लागली आहे यांची खंत वाटते. याविषयी ते म्हणतात, "आमच्या संघटनेचंबी जरा आता वायसंच व्हायच्या मागं दिसते एकनाथ. भावाभावांत फाटाफूट पडती तशी आता संघटनेतबी फाटाफूट पडती वाटते"[४] ही संघटनेची अवस्था पाहून तेजराव तात्या दु:खी होतात, व्यथित होतात. "आमचा नेता म्हन्ते, आपून सरकारात गेल्याबगर शेतकऱ्याच्या हिताच्या योजना काई राबवू शकत नाई"[५] येथे संघटनेविषयी असलेली त्यांची सामाजिक बांधिलकी, शेतकऱ्याविषयी वाटणारी कळकळ दिसून येते.

समाजात अनेक प्रकारच्या व्यक्ती दिसतात. एखादा शेतकरी मुलाचे लग्न करायचे म्हणून शेती करतो. कारण शेती पडून ठेवली तर मुलासाठी चांगली पार्टी येणार नाही. शिवाय भरभक्कम हुंडासुध्दा भेटणार नाही. असाही विचार करणारे शेतकरी समाजात दिसून येतात. मोठ - मोठे नोकरदार इन्कमटॅक्स वाचवण्यासाठी शेती खरेदी करतात. तर गरीब शेतकऱ्यांची मुले नोकरी मिळविण्यासाठी शेती विकण्याचा मार्ग पत्करतात. ही सत्य परिस्थिती आहे

ग्रामीण माणसे अधिक श्रध्दाळू असतात. आपल्या गावात असणाऱ्या देवावर त्यांची अपार श्रध्दा असते. गाईचे पहिले दूध महादेवाच्या पिंडीवर वाहण्याची रीत या

गावात असते. दर पौर्णिमेला वांझ बायकांनी या पिंडीभोवती प्रदक्षिणा घातल्या तर त्यांना मुले होतात अशी भोळीभाबडी श्रध्दा या लोकांच्या मनात आहे.

रंगराव खराटे हा कास्तकार शेतकरी अंगावर रॉकेल ओतून ऊसात स्वत:ला जाळून घेतो. त्याची पत्नीही त्याच्याबरोबर उडी घेते. येथे सती जाणाऱ्या पत्नीचे दर्शन घडविले आहे. आपल्या देशात मोठ - मोठे मंत्री लाखो रूपयांचा भ्रष्टाचार करतात. मतदानाच्या वेळी अनेक तरूणांना हाताशी धरून प्रचारकी थाट करतात, सभा घेतात. परंतु ह्या सभा एक दिखावाच असतो. निवडून दिलेला आमदार किंवा खासदार पुन्हा निवडणुका येईपर्यंत त्या गावात पायही ठेवत नाही. मालपाणी या व्यक्तिरेखेतून लेखकाने आपल्या देशातील आमदारच उभे केले आहेत असे वाटल्याशिवाय राहत नाही. या विषयी लेखक लिहितो, "ते हॉलमध्ये आले आणि कोपऱ्यात खूर्च्या धरून बसले. समोर मोठया सोफ्यावर आमदार बसलेला होता त्याच्याशी दोन माणसं जवळच्या खुर्च्यावर बसून कसलीशी चर्चा करीत होती. बाकीचे आणखी सहा - सात लोक भिंतीलगत टाकलेल्या खुर्च्यावर बसून आपला नंबर कधी येतो, याची वाट पाहत होती. खुर्चीवरची दोन माणसं उठून गेली आणि इतरांना तुमचं काय ? तुमचं काय ? असं विचारत आमदार त्यांना कटवू लागला."[६]

वारकरी पंथाचे सुभानराव दगडू महाकाळच्या वागण्या बोलण्यातून पूर्णपणे ढासळतात. शेतात मांसाहार केला जातोय हे कळताच त्यांचे मन गलबलून जाते. सुभानरावांचे जीवन हे एका चाकोरीतून जाणारे असते. त्यांनी आपली चाकोरी कधीच सोडली नाही. त्यातच त्यांच्या जीवनाचा शेवट होतो. शेतकरी वर्गापैकी निम्मे शेतकरी वारकरी असतात. त्यांच्या गळयात माळा असतात. पण एखादी व्यक्ती गळयात माळ वेगळयाच कारणासाठी घालते. नागेश देव्हाडेच्या व्यक्तिरेखेतून समाजातील याही प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. मटण खाण्याची त्याला खूप इच्छा होत असते पण पैशाअभावी मटण खायला मिळत नसते. मटणासाठी जीव झुरतो. जीव झुरण्यापेक्षा माळेचा आधार त्याला अधिक योग्य वाटतो. माळ घातल्याने मटण खाण्याची त्याची इच्छा संपून जाते.

ग्रामीण जीवनाला कंटाळून एखादा तरूण पोट भरण्यासाठी शहराकडे निघून जातो. शहरात बांधकामावर मजुर म्हणून पोट भरतो. तो गावात आल्यानंतर मजेत असतो. म्हणजेच ग्रामीण जीवनापेक्षा शहरी जीवन सुखी आहे असे खेडयातील लोकांना वाटते.

शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती यामध्ये खूप तफावत आहे. ही तफावत लेखकाने सामाजिक जीवनचित्राच्या अनुषंगाने दाखवून दिली आहे. शहरी संस्कृती

ही आधुनिक काळातील संस्कृती आहे तर ग्रामीण संस्कृती ही पूर्वापार चालत आलेली आहे. लेखकाने ग्रामीण संस्कृतीबरोबरच शहरी संस्कृतीचे समाजजीवनदर्शनही कादंबरीतून घडविले आहे.

दत्ता वारे व ममता वारे हे सुशिक्षित दांपत्य खेडयात असूनसुध्दा शहरी पध्दतीने जीवन जगत असते. एकनाथला त्यांच्या या जीवनाचा सतत हेवा वाटतो. त्यालाही ग्रामीण जीवनापेक्षा शहरी जीवन जगावे वाटत होते. म्हणूनच शहरी वातावरणात रममाण होणारा एकनाथ 'अलका' या शहरी मुलीशी लग्न करतो. पण नंतर मात्र त्याच्यावर पश्चात्ताप करण्याची वेळ येते.

लेखकाने ग्रामीण आणि शहरीजीवन याची तुलना 'बारोमास' मध्ये केलेली आहे. शहर आणि गाव या जीवन पध्दतीमध्ये, राहणीमानपध्दतीमध्ये बऱ्याच प्रमाणात फरक आहे. माणूस हा कितीही मोठा झाला तरी आपल्या मातीला किंवा तो जेथे अधिक काळ राहिला आहे त्या मातीला कधीच विसरू शकत नाही. त्यांचे पाय सतत या मातीत रोवलेले असतात. ग्रामीण माणूस तर कधीच आपल्या ग्रामीण मातीला विसरू शकत नाही. आपल्या माणसांना तो कधी विसरू शकत नाही. याचेच चित्र एकनाथच्या वागण्यातून, बोलण्यातून स्पष्ट होताना दिसते.

एकनाथचे बालपण 'सांजोळ' या गावात गेलेले असते. शिक्षणासाठी तो 'मोहाडी' सारख्या शहरात जातो. कारण गावामध्ये शिक्षणाच्या अपुऱ्या सोई असतात. एकनाथचे मन या शहरी वातावरणात रमून जाते. तेथील निसर्गाशी, झाडांझुडपाशी तो एकरूप होतो. 'गर्द झाडी असलेल्या शहरात थंडगार हवेच्या झुळका वाहत होत्या. आजुबाजूचे ऐश्वर्यसंपन्न बंगले मस्त वाटत होते'[७]

मोहाडीतील नोकरदारांची प्रशस्त घरे, रस्ते, झाडे एकनाथच्या मनात घर करून राहतात. एकनाथचे वास्तव्य शहरी आणि ग्रामीण या दोन्ही ठिकाणी होते. परंतु त्याला मोहाडीपेक्षा 'सांजोळ' हे गाव प्रत्येक बाबतीत भकास वाटून जाते. एकनाथ हा सुशिक्षित असून गावात त्याला अशिक्षित असल्यासारखे वागावे लागते. अशुध्द बोलावे लागते. तो जरी शुध्द बोलला तर गावातले लोक त्याला नावे ठेवतात. याउलट तो जेव्हा सासुरवाडीला 'मोहाडीत' जातो तेव्हा मात्र त्याची मेहुणी ग्रामीण आणि शहरी पध्दतीतील फरक दाखवून त्याला सतत अपमानास्पद टोमणे मारत असते. याविषयी लेखक लिहितो, 'खेडयातल्या लोकांना काहीच मॅनर्स नसतात.'[८] 'खेडयातल्या आळशी लोकांना लवकर उठायची सवय नसते....'[९]

जयाच्या अशा टोचूण बोलण्याने त्याच्या मनाचा अतिशय कोंडमारा होतो.

जया प्रत्येक वेळी शहरी आणि ग्रामीण जीवनात असलेला फरक एकनाथला सतत दाखवून देत असते व अपमान करत असते.

ग्रामीण आणि शहरी संस्कृती, रीतीरिवाज, चालीरीती, रूढी, परंपरा भिन्न स्वरूपाच्या असतात. हेच लेखकाने शहरी आणि ग्रामीण समाजजीवनाची तुलना करून स्पष्ट करून दाखवले आहे.

शहरी जीवनाच्या तुलनेत ग्रामीण जीवन अतिशय खडतर आहे याची जाणीव लेखकाला असल्याने लेखकाने केलेले हे समाज जीवन चित्रण अत्यंत वास्तवदर्शी चितारले आहे यात शंकाच नाही.

ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण करताना लेखक कुठेही कमी पडलेला दिसून येत नाही. ग्रामीण जीवनाचा आविष्कार तर घडविला आहेच पण प्रसंगातून, पात्राच्या संवादातून ग्रामीण समाजाचे चित्र स्पष्ट होते. कास्तकार लोकांचे शेतीनिष्ठ जीवन, ग्रामीण जीवन संस्कृती, ग्रामीण परिसर, तेथील वातावरण, त्यांचे पोषाख, खाणे - पिणे, बोलणे - चालणे या वातावरणाशी अनुसरून असणारी पात्रांची मने इत्यादी दर्शन घडविले आहे. ग्रामीण भागातील वीजसमस्या, रस्ते, झाडे - झुडपे, बांध, ओढा, अस्वच्छ शौचालय इत्यादीचे चित्रण जिवंतपणे साकार केले आहे.

ग्रामीण समाजाचे प्रश्न, दुष्काळामुळे कृषिसंस्कृतीचा झालेला ऱ्हास, शहरी संस्कृतीचे झालेले आक्रमण, ग्रामीण स्त्रियांच्या व्यथा, वेदना येथे अत्यंत मार्मिकपणे व्यक्त झाल्या आहेत. ग्रामीण व्यक्तींच्या अंतर्मनात शिरून त्यांच्या भावनांच्या गुंतागुंतीचे चित्रण अत्यंत हळुवारपणे टिपले आहे. कारूण्याबरोबर भेदक वास्तवाचे चित्रण तसेच मानवी मनातील लैंगिकता आणि वासना यांचेही चित्रण आलेले आहे. लेखक पात्रांच्या अंतर्मनात शिरून त्याच्या मनातील सल उलगडून दाखवतो. याविषयी लेखक लिहितो 'असं म्हणून तिने दीर्घ सुस्कारा टाकला. कड बदलली आणि त्याच्या काळजाचं गटार झालं. डोळे ओलसर झाले. तेव्हा त्याला वाटलं; निदान तिने ते पहावेत. म्हणजे तिला कळेल आपलं तिच्यावर किती प्रेम आहे ते. पण नुस्तं प्रेम काय चुलीत घालायचं ? संसाराचा गाडा रेटायला पैसा पाहिजे. तोच आपल्याजवळ नाही ..... हा शेतीचा धंदा असा झाला. पैसा फक्त जात राहतो. येत काहीच नाही.'[१०]

सामाजिक, आर्थिक अडचणी या शेतकऱ्यासमोर तरूणांसमोर उभ्या आहेतच पण यापेक्षा त्याच्या वैयक्तिक जीवनातील वेदना मनाच्या ठिकऱ्या करणाऱ्या आहेत. पारंपरिक कृषिपरंपरेचा ऱ्हास होऊन आधुनिक शेतीपध्दतीचा अवलंब करणारा

शेतकरीही दारिद्र्यातच खितपत पडलेला दिसतो. शेतकरी उपेक्षित जीवन जगत असतो.

शेजारी पाजारी, भाऊबंदकी यांच्यातील नातेसंबंध एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होणारी ही गावाकडची माणसे, मैत्रभाव हे सारे चित्रण लेखकाने अत्यंत मनोज्ञतेने चित्रित केले आहे. एक जिवंत खेडे तसेच निसर्गाची कृपा अवकृपा, शेतकरी कुटुंबाची झालेली वाताहत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, भ्रष्टाचार हाच झालेला श्रीमंताचा शिष्टाचार या साऱ्या गोष्टीचे चित्रण करण्यात लेखक कमालीचा यशस्वी झालेला दिसून येतो. साऱ्या बहुजन समाजाला एकत्रित गुंफले आहे.

दारिद्र्याच्या दलदलीत रूतून बसलेला कृषिनिष्ठ शेतकरी, भ्रष्टाचाराने गांजलेली शिक्षणव्यवस्था, भपकेबाज श्रीमंतीला भूलून वाममार्गाला लागलेली युवापिढी, गलेलठ्ठ व्यापारीवर्ग, सावकारशाही या सर्व सामाजिक प्रश्नावर लेखकाने डोळसपणे भाष्य केलेले आहे.

'बारोमास' या कलाकृतीतून लेखकाने ग्रामीण समाजातील धगधगते वास्तव अत्यंत परिणामकारक शैलीत व्यक्त केले आहे. हे सामाजिक वास्तव वाचकांना झपाटून तर टाकतेच पण विचार करायलाही भाग पाडते.

'बारोमास' मधील ग्रामीण शेतकऱ्याचे जीवन हे पूर्णपणे दारिद्र्याने बरबटलेले दिसून येते. तरीही शेतकरी निसर्ग, शेती आणि प्राणी यांच्याशी एकजीव झालेला असतो.

आपल्या देशातील एका प्रातिनिधिक खेडयातील सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रश्न मांडण्यात लेखक यशस्वी झाला आहे. ग्रामीण समाजातील ज्वलंत प्रश्नांवर लेखकाने भेदकपणे चित्रण करून ग्रामीण वास्तवाचे भान आणून दिले आहे.

एका कुटुंबाच्या माध्यमातून ग्रामीण समाजाच्या व्यथा वेदनांचे भयानक वास्तव दर्शन लेखकाने 'बारोमास' मधून घडविले आहे. ग्रामीण जीवन चित्रणाविषयी श्रीकांत बोजेवार लिहितात, "ग्रामीण भागातील एखाद्या अभावग्रस्त शेतकऱ्याच्या घरात वर्षभर कुणी तरी व्हिडीओ कॅमेरा लावून ठेवावा आणि मग वर्षभर ती 'रिअल टाईम' फिल्म आपण पाहावी. असा अनुभव सदानंद देशमुख यांची 'बारोमास' ही कादंबरी वाचताना येतो."[११] ग्रामीण सामाजिक वेदनेचा दस्तऐवज म्हणून या कलाकृतीकडे पाहिले तरी ते वावगे ठरू नये. वर्तमानकाळातील समाजजीवनाचे यथातथ्य चित्रण करणारी 'बारोमास' ही कलाकृती आजूबाजूच्या ग्रामीण तसेच शहरी समाजजीवनाची जाणीव करून देते. या जाणीवेतच कादंबरीचे यश सामावले आहे.

❖ **विषमाधिष्ठीत समाजव्यवस्था : -**

आर्थिक महासत्ता बनू पाहणारा आपला भारत देश हा धर्मनिरपेक्ष आहे. आपल्या देशात अनेक जातीधर्माचे लोक राहतात. कायद्याने सर्वांना समान अधिकार प्राप्त करून दिले आहेत. सर्व समाजाला समतेच्या पातळीवर आणण्यासाठी मागासवर्गीयांसाठी काही राखीव जागा ठेवलेल्या आहेत. परंतु आपल्या समाजात मात्र समानतेपेक्षा विषमताच अधिक दिसून येते.

शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक या सर्व क्षेत्रात विषमता आहे. ग्रामीण समाजामध्ये आर्थिक विषमतेची दरी फार मोठी आहे. ही विषमतेची दरी वाढतच चाललेली आहे. या विषमाधिष्ठीत समाजव्यवस्थेमध्ये सर्वसाधारण जनता, सामान्य माणूस, शेतकरी, तरूण पिढी भरडून निघत आहे. आपल्या समाजाची रचनाच अशी विषमाधिष्ठीत आहे की, श्रीमंतवर्ग हा अतिश्रीमंत होत चालला तर गरीब हा अतिगरीब होत चालला आहे. सर्वसामान्य हा सामान्यच जीवन जगत आहे. श्रीमंताच्या वैभवाच्या तुलनेत शेतकरी दरिद्रीच असतो. सुभानराव हा कष्टाळू शेतकरी दारिद्रयात जीवन जगत असतो. तर दगडू महाकाळ हा श्रीमंत सावकार गर्भश्रीमंतीत जीवन जगत असतो. शेतकऱ्याच्या कष्टावर श्रीमंत व्यापारी गलेलठ्ठ होतात. या व्यापाऱ्यांच्या गळयात बोटाएवढया जाडीचा सोन्याचा गोप आणि तीन बोटात सोन्याच्या अंगठया असतात. शेतकऱ्याकडे मात्र फुटका मणीही नसतो. श्रीमंताच्या वैभवसंपन्न घरात टी. व्ही., सोफासेट, दिवाण, चकचक उश्या आणि गाद्या या सर्व महागडया सुखसुविधा उपभोगायला असतात. दरिद्री शेतकऱ्याच्या घरात मात्र शेतकामास लागणारी मोडकी तोडकी अवजारे असतात. हेच त्याचे वैभव असते. श्रीमंताच्या घरी लक्ष्मी पाणी भरते पण, शेतकऱ्याच्या घरची लक्ष्मी रोगराईन, गारपिटीनं झडून जाते. आपली समाजव्यवस्था विषमतेच्या पायावर आधारित आहे.

आधुनिक काळाच्या रेठयामध्ये जागतिकीकरणाने अधिक वेग घेतला आहे. दळणवळण वाढले आहे. शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती एकमेकांच्याजवळ आली आहे. परंतु शहराच्या तुलनेत ग्रामीण भाग अजूनही मागासलेला आहे. मोहाडीसारख्या शहरात सगळयाच भौतिक सुखसुविधा असतात तर 'सांजोळ' सारख्या खेडयात मात्र अशा कोणत्याच सुखसुविधा नसतात. लेखकाने 'बारोमास' या कलाकृतीतून ग्रामीण आणि शहरी जीवनपध्दतीतील विषमताच प्रकट केलेली दिसून येते. शहरातील नोकरवर्ग श्रीमंतीत जीवन जगताना दिसतो. या संदर्भात लेखक लिहितो, 'अलकाचा बाप साधा पगारदार पण कसा वैभवात जगतो. आपण अठरा सोनखाशी अधिक आठ कल्याणी बरोबर सव्वीस एकरांचे मालक पण धडकी खुर्ची नाही आपल्या घरात.'[११२]

एकनाथचा हा विचारसुध्दा विषमताच दाखवून देतो. लेखकाने अलकाच्या माहेरची श्रीमंती आणि सासरची गरीबी यांचे तुलनात्मक चित्रण करून विषमाधिष्ठीत असणाऱ्या समाजव्यवस्थेचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.

शेतकऱ्याच्या शेतमालाचे भाव वाढले तर पेपरमध्ये जीवनावश्यक वस्तू महागल्या असे छापून येते पण शहरातील कोणतीही वस्तू महागली तरी कोणीही काही चर्चा करत नाही. नोकरदारांचे पगार दसपटीने वाढत गेले मात्र शेतमालाचे दर सहापटीनेसुध्दा वाढले नाहीत.

'नरूभाऊ' या शेतकऱ्याकडे नैतिकता, बुध्दिमत्ता आहे. शेतकऱ्यांविषयी कळवळा आहे पण पैसा नाही. याउलट दगडू महाकाळकडे अमाप पैसा आहे म्हणून त्याला किंमत आहे. आजच्या काळात माणसापेक्षा पैशाला अधिक किंमत आहे. पैशाच्या जोरावर महाकाळ तीन वेळा ग्रामपंचायतीत निवडून येतो आणि सरपंच होतो. साऱ्या गावावर त्याची सत्ता असते. ग्रामपंचायतीतील सरकारीयोजना तोच गिळंकृत करतो. तरीसुध्दा त्याच्या विरोधात कोणीही जाऊ शकत नाही. त्याच्याशिवाय गावातील पानही हालत नाही एवढी त्याची गावावर दहशत असते. शासकीय अधिकाऱ्यांना पाटर्या देऊन खुश ठेवतो. निवडणुकाच्या काळात तरूणांना दारूच्या बाटल्या देतो. गरीबांना कपडे वाटतो. निवडून आल्यानंतर स्वत:ची भाकरी भाजून घेतो. स्वार्थ साधतो. हा मंऱ्यांचा खरा कार्यकर्ता ठरतो. पण निवडणुकांच्या काळात प्रचार करणारा गावातील तरूण वर्ग कार्यकर्ता ठरत नाही. दुष्काळामुळे व्यथित झालेला पंधरा एकराचा धनी विष खायला जवळ पैसा नाही असे म्हणतो पण या दुष्काळाच्याच काळात हे श्रीमंत सावकार आपला स्वार्थ साधून घेतात.

याचाच अर्थ शेतकऱ्याचे जीवन खडतर आहे. ज्या शेतकऱ्याचे जीवन केवळ शेतीवरच अवलंबून आहे त्याचा दुसरा कोणताच व्यवसाय नाही अशा शेतकऱ्याची अवस्था तर अत्यंत भयानक होऊन जाते. शेती ही निसर्गचक्र, बाजारपेठा, व्यापारीकरण या चक्रात सापडलेली आहे. शेतकरी खर्चाची तोंड मिळवणी करता करता जेरीस येतो. शेवटी सावकाराकडून कर्ज काढतो दुर्दैवाने काढलेले कर्ज तर फिटत नाहीच पण वाढणारे व्याजही तो फेडू शकत नाही. शेवटी कर्ज वाढत जाते. कर्जाचा बोजा डोक्यावर होतो. जीवन जगणे असह्य होऊन आत्महत्या करून शेतकरी आपले जीवन संपवून टाकतो. शेतकऱ्याच्या कष्टावर श्रीमंत व्यापारी गलेलठ्ठ होतात तर सावकार पैशाच्या गादीवर लोळतात. शेतकरी मात्र दारिद्र्याच्या खायीत लोटला जात आहे.

पूर्वीपासून आपल्या देशात समतेचा अभाव आहे. पूर्वीच्या काळी उच्च

वर्गीयांनी दलितांवर अत्याचार केले. हीच परिस्थिती आज शेतकरी वर्गावर आली आहे. आज खेडयापाडयातील शेतकऱ्यांना दलित म्हणण्याची वेळ आली आहे. या संदर्भात लेखक लिहितो, 'खेडेपाडे म्हन्जे दलित वस्ती पह्यले ते जसे गुलामावाणी जगत, गावाच्या बाहीर तसे आता खेडेपाडे झाले. म्हणून आजच्या काळात दलिताची व्याख्या बदलणं भाग हाये. खेडयापाडयात राह्यते त्यो दलित. आजच्या काळात म्हणूनच सम्दे चांगले चांगले लोकं शहेरात पळतात जातवान व्हायसाठी'[१३]

'बारोमास' मध्ये शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातही विषमता दिसून येते. या विषमाधिष्ठीत समाजव्यवस्थेमुळे शेतकरी वर्गावर अन्याय होतच असतो पण तरूण पिढीवरही अन्याय होत असतो. त्यामुळे आजच्या तरूणपिढीच्या मनात या समाजव्यवस्थेविषयी चीड निर्माण झाली आहे. शेतकऱ्याच्या मुलांनी शिकूच नये की काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. आजच्या काळात गुणवत्तेपेक्षा पैशाला अधिक महत्त्व आहे. म्हणूनच मधुसारखा हुशार तरूण स्पर्धापरीक्षेत पास असूनसुध्दा वशिला आणि पैशावाचून बेकार होतो आणि सुरेश साठे मधुच्याच पुस्तकावर अभ्यास करून वशिला लावून आणि पैसा भरून नोकरीस लागतो. आणि बेकायदेशीरपणे सरकारी योजना स्वत: हडप करतो. सरकारी सेवेत कार्यरत असणारे अधिकारीच भ्रष्टाचार करताना दिसतात. नोकरी मिळण्यासाठी श्रीमंत असणारे तरूण आधीच जागा फिक्स करून ठेवतात. एकनाथसारखे तरूण नोकरीसाठी पन्नास मुलाखती देतात. पण त्यांना मात्र नोकरी लागत नाही. नोकरीसाठी लाचार झालेली ही तरूण पिढी आणि आपला सर्व समाजच या भ्रष्टाचाराला खतपाणी घालत आहे. शासकीय अधिकारी दोषी तर आहेतच पण आपला समाजही तितकाच दोषी आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

समाजात अशीही काही कुटुंबे दिसून येतात की, पती - पत्नी दोघेही नोकरी करतात. त्यामुळे ते भरपूर पैसा कमवतात. त्यांना कोणत्याही गोष्टीची कमतरता नसते. गरीबांना किंमत देत नाहीत. ऐशोआरामात जीवन जगतात आणि खेडयातले तरूण बेरोजगारीचे जीवन जगतात. मधु आपल्या या समाजव्यवस्थेविषयी तिरस्कार बोलून दाखवतो, 'सगळा इच्चकडोणाच हाये आपल्या समाजव्यवस्थेचा. गावोगावीच आहेत आशे नवरा - बायको नवकरीले. पैशाच्या मस्तीनं ठोकरीनं उडवतात आशे लोकं. दणकावून बंगल्यावर बंगले बांधतात अन् आमच्यासारखे खेडयापाडयांतले शिकून सवरून पुन्हा मढे उकरत फिरतात. त्याह्याच्या नशिबातली माती काई जात नाई.'[१४]

समाजाला समानतेच्या पातळीवर आणण्यासाठी सरकारने मागासवर्गीयांसाठी राखीव जागा प्रत्येक क्षेत्रामध्ये ठेवल्या आहेत. याचाही फायदा वशिला आणि पैसा

असणाऱ्या श्रीमंतालाच होतो. दिनकर दाभाडे आणि सोपान भगत हे दोघेही तरूण एकाच जातीतील असूनसुध्दा सोपान भगत राखीव जागेचा फायदा घेऊन वरपर्यंत वशिला लावून पैसा भरतो आणि कनिष्ठ महाविद्यालयात नोकरीला लागतो. एकनाथला सोपान भगतचे घर म्हणजे आधुनिक काळातील वैभवसंपन्न राजवाडा वाटतो. कारण पती - पत्नी भरपूर पैसा कमवतात. कॉलेजमध्ये असताना बिडया, सिगरेट ओढणारा भगत मालदार होतो आणि दिनकर दाभाडे बेरोजगारीचे जीवन जगतो ही आपली समाजव्यवस्था.

दिलीप पवार हा तरूण दररोज शाळेत येऊन मुलांना प्रामाणिकपणे शिकवत असतो तर त्याच्या नोकरीवर गदा येते पण सुरेश साठे या श्रीमंताची पत्नी मात्र चार चार दिवसाच्या सह्या एकदमच मस्टरवर करू शकते. कारण सुरेश साठेने पैशाच्या जोरावर वरच्या अधिकाऱ्यांना आपल्या खिशात ठेवले आहे.

आपला देश धर्मनिरपेक्ष असला तरीही जाती जातीमध्ये भेदभाव केला जातो. अप्रत्यक्ष का होईना जातियव्यवस्थेवरून अकांडतांडव निर्माण होत आहे. कारण आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला स्वत:चे अस्तित्व निर्माण करावयाचे असते. पण राखीव जागेच्या नावाखाली किंवा उच्च वर्गातील जागांच्या नावाखाली प्रत्येकजण आपापल्या जातीलाच प्राधान्य देत आहे. शाळेतील संस्थाचालक आपल्या जातीतला माणूस चिकटवतात तो त्या पात्रतेचा असो वा नसो. या वशिलेबाजीमुळे पात्रता असणारे तरूण बाजूला फेकले जातात. एकनाथ या तरूणाकडे शैक्षणिक पात्रता योग्य असूनही तो प्राथमिक शाळेवरसुध्दा शिक्षक होऊ शकत नाही. ही दुर्दैवाची बाब आहे.

'बारोमास' मधील एकनाथ आणि दिनकर दाभाडे यांचा जातिव्यवस्थेवरील संवाद अत्यंत वास्तववादी वाटतो. लेखक या संदर्भात लिहितो,

'वैरागडच्या एका कॉलेजवर जागा होती. एस. सी. साठी म्हणून हेलपाटे घेत गेलो. तर तिथं म्हणाले, एस. सी. च्या जागेसाठी आता महार, मांग नाही पाहिजे, दुसरे कोणीही चालतात. तुझा काही अनुभव ?'

'अनेक आहेत. पण त्या आठवणी दुखतात. एका ब्राह्मणांच्या संस्थेवर म्हणत, तुमच्या कुणब्या मराठयांसाठी इकडे शिवाजी आहे, तिकडे रयत आहे. तुम्ही तुमच्या बिळात घुसा, आम्ही आमच्या बिळात घुसतो.'

'हाच अनुभव ब्राह्मणांना इतर संस्थांत येत असेल.'

'आता प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र संस्था निघाल्या पाहिजेत जातवार.'

'तसं झालं तर मग आम्ही बोंबललो.'

'आम्हीही. कारण आमच्यात ज्यांनी आधी जागा व्यापल्या ते दुसऱ्यांना काही आत घुसू देत नाहीत.'

'जातिव्यवस्था आता खूपच टोकदार होताना दिसत आहे. गेला जमाना गांधी - आंबेडकरांचा. आता कुठं जास्त आंतरजातीय विवाह होताना दिसतात.'

'उलट आता आमच्यात काय अन् तुमच्यात काय ? जातिजातींत पुन्हा उपजाती तयार होत आहेत. शहरातले खेडयातल्यांशी संबंध जुळवत नाहीत. दलित असो की मराठा, जो नोकरीधंद्याच्या निमित्ताने शहरात स्थिर झाला तो आपल्याच खेडयातल्या जातींना शूद्र समजतो. माझ्या सासरी गेल्यावर मी शंभर - दीडशे वर्षापूर्वीचा अस्पृश्य, शूद्र कसा होता याची मानसिकता अनुभवू शकतो.'[१५] हा संवाद म्हणजे जातियव्यवस्थेवर केलेले भाष्य तर आहेच शिवाय विषम समाजाचे दर्शन घडले आहे.

शहरातील गर्भश्रीमंत लोक आपल्या मुलांना कोचिंग क्लास लावतात त्यामुळे त्यांना भरपूर मार्क्स मिळतात किंवा कमी मार्क्स मिळाले तरी पैसे भरून मार्क्स वाढवतात आणि त्यांचाच नंबर लागतो. खेडयापाडयातील शेतकऱ्यांच्या मुलांनी कितीही प्रयत्न केले तरी पैशाअभावी या स्पर्धेच्या युगात मागेच पडतात. खेडयातील मुलांत बुध्दिमत्ता असूनही काही फायदा होत नाही. स्पर्धापरीक्षेत त्यांचा नंबर कधीच लागत नाही म्हणूनच सुनील जोशीसारखा बुध्दिवंत तरूण गावात बेकार म्हणून फिरतो. याशिवाय तो दारूडयाही बनतो. ही सत्य परिस्थिती लेखकाने 'बारोमास' मध्ये चित्रित केली आहे.

शैक्षणिक संस्थातील वशिलेबाजीवर गिरीश मेहता विद्यालयात नोकरीस लागतो. एकनाथ मात्र शेतात बैलांच्या मागे तिफण चालवत असतो. शैक्षणिक क्षेत्रातील नियम सतत बदलत असतात. या नियम परिवर्तनाचा परिणाम फायदेशीर तितकाच नुकसानकारकही असतो. या बदलाचा काहींना फायदा होतो तर काहींना तोटा होतो. दिनकर दाभाडेबरोबर शिकणारा शेवलकर मोहाडीत सिनियर कॉलेजवर नोकरीस लागतो आणि महिना पंधरा - वीस हजार रूपये कमावतो. दिनकर दाभाडे आणि एकनाथ मात्र दिवसाला शंभर रूपये कमवू शकत नाहीत. हे वास्तव लेखकाने अत्यंत दाहकतेने चित्रित केले आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात गुणवत्तेपेक्षा वशिलेबाजी आणि आर्थिक मोबदल्याला अधिक महत्त्व आहे. त्यामुळे हुशार तरूणांची गळचेपी होते. या तरूण

पिढीवर अन्याय होत असतो. एकनाथ हा पद्वीधर असूनसुध्दा शेतात राबत असतो पण त्याला दररोज काम करणाऱ्या मजुराइतकीही मजुरी मिळत नाही. या विषमाधिष्ठीत समाजव्यवस्थेत तो होरपळून निघतो. त्याच्या मनातील भयाण व्यथेसंदर्भात लेखक लिहितो, '.... आपल्या जीवनाला अर्थ काय ? आजच्या युगात आपण किती मागे पडलो.... आजचं युग स्पर्धेचं .... आजचं युग पैशाचं. तीन - चार कॉलेजवर तज्ज्ञ मंडळींनी आपलं सिलेक्शन केलं आणि संस्थाचालकांनी रोख पैशाची मागणी केल्यावर आपण हातपाय गाळले. स्पर्धेच्या युगात आपण मागे पडलो.... मागे मागेच जात राहिलो. भांडवल लावा, भरपूर नफा घ्या या व्यावहारिक तत्त्वाशी आपण का जुळवून घेऊ शकलो नाही ? केवळ पैसा नव्हता म्हणून! आज आपल्याला पंधरा - सोळा हजार पगार असता. आपल्यापेक्षाही कमी टक्केवारी असणारे, कॉलेजच्या कार्यक्रमात चार वाक्यं धड बोलता न येणारे प्राध्यापक आहेत. बंगल्यात राहतात. गाडया उडवतात आणि आपण ?'[१६] या व्यथेतून त्याची तगमग दिसून येते.

या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात केवळ पैशाअभावी मागे पडलेले कितीतरी तरूण आज बेकार म्हणून समाजात फिरताना दिसतात आणि कमी मार्क्स पडलेले किंवा ज्यांना चार वाक्यही धड बोलता येत नाहीत अशा तरूणांची निवड कॉलेजवर प्राध्यापक म्हणून होते. या सर्व बाबींमुळे हुशार असणाऱ्या तरूण पिढीच्या मनावर विपरीत असा परिणाम होताना दिसतो. शिक्षणाविषयी अनास्था निर्माण होते. आपण उगीचच इतके शिकलो. या शिक्षणाचा आपल्याला काहीच उपयोग झाला नाही. रात्रंदिवस शेतात राबावे लागते. अशी खंत एकनाथच्या मनाला वाटते. आपल्या बरोबर शिकणारे कोणी जातीच्या आधारावर नोकरीस लागतो तर कोणी कोचिंगक्लास घेऊन विद्यार्थ्यांकडून भरपूर फी घेऊन अमाप पैसा कमवून गब्बर झाले, तर दिनकर दाभाडेसारखा एम. ए. फर्स्ट क्लास सेट पास असूनही नवरा - नवरीच्या लग्नाच्या वरातीपुढे बँडपार्टीमध्ये सामील होऊन बिगूल वाजवतो ही आपली समाजव्यवस्था. या विषमाधिष्ठीत समाजव्यवस्थेवर बॉम्ब टाकावा असे एकनाथला वाटते. असे वाटणेही साहजिकच आहे. जीवनात आलेल्या कटू अनुभवावरून एकनाथच्या मनाचे खच्चीकरण हाते. हा खडतर प्रवास करताना त्याची झालेली तगमग पाहून मन सुन्न सुन्न होते.

या समाजव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत असतो. मोरवाणीसारखा एखादा डॉक्टरसुध्दा पैसे असल्याशिवाय पेशंट तपासत नाही कारण शेतकरी कंगाल असतो. मजुराबाबतीत तो असे वागत नाही कारण मजुराकडे रोजची कमाई असते.



SHIVAJI ...

नोकरीवाल्याना महिन्याला पगार मिळतो. मात्र शेतकऱ्याकडे रोख पैसाच येत नसतो. या विषमसमाजव्यवस्थेत शेतकरीवर्ग सावकाराच्या शोषणाचे बळी ठरतात. तरूण पिढी विनाशाच्या गर्तेत सापडलेली आहे. या विषमतेच्या दरीमुळे शेतकऱ्याच्या वाटयाला केवळ निराशा, व्यथा - वेदनाच येत असतात. शेतकऱ्याच्या होणाऱ्या आत्महत्या, सुशिक्षित युवकांचा आक्रोश कधी संपणार ? ग्रामीण आणि शहरी संस्कृतीतील दरी कधी कमी होईल का ? असे अनेक प्रश्न निर्माण करणारी 'बारोमास' ही कादंबरी सामाजिक जीवनाचा एक दस्तऐवजच आहे.

सदानंद देशमुख यांनी समाजातील सर्व क्षेत्रात असलेली विषमता 'बारोमास' मधून परखडपणे मांडलेली आहे. ही विषमता सर्वच समाजाला झळ पोहचविणारी आहे. समाजातील वास्तवतेचे भान आणून देणारी ही एक उत्कृष्ट कादंबरी होय. सामाजिक दृष्टिकोनातून या गोष्टींचा विचार होणे गरजेचे आहे. एक सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातील ही विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करायला हवी. ही परिस्थिती बदलण्यासाठी सरकारने, सर्व समाजाने योग्य ते पाऊल उचलणे गरजेचे आहे. ही विवंचना थांबली पाहिजे तरच देश सुधारेल अशी आशा वाटते. तरूण पिढीने या प्रश्नांचा गांभीर्याने विचार करून योग्य त्या दिशेने पावले उचलायला हवीत. केवळ सरकारला किंवा समाजाला दोष देणे योग्य नव्हे. आपण कुठे कमी पडत आहोत याचाही शोध घेऊन परिपूर्ण विचार करून योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम व्हायला हवे.

सर्व तरूणांनी एकत्र येऊन अर्थार्जनाचे कोणकोणते उपक्रम निर्माण करता येतील ? कोणकोणते व्यवसाय सुरू करता येतील ? याचा एकत्रितपणे साकल्याने विचार करून नवनवीन मार्ग शोधले पाहिजेत. 'एकी हेच बळ आहे' ही विचारजागृती प्रत्येक तरूणांच्या मनात निर्माण झाली पाहिजे. सर्व तरूणांनी संघटित होऊन सरकारला, समाजाला आपले म्हणणे पटवून दिले पाहिजे. त्यासाठी सनदशीर मार्गाने आपले विचार राज्यकर्त्यांना सांगून त्यांना तरूणवर्गासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास भाग पाडले पाहिजे. आता नुसते गप्पा बसून चालणार नाही. नवा मार्ग, नवी दिशा, नवी क्रांती घडवली पाहिजे.

सर्व तरूणांनी नेतृत्त्वासाठी पुढे आले पाहिजे. अन्याय अत्याचाराविरूध्द आवाज उठविला पाहिजे. राज्यकर्ते नेते आपणच निवडून देत असतो. निवडणुका दर पाच वर्षानी येतात - जातात. तरूणांसाठी या राज्यकर्त्यांनी कोणते पाऊल उचलले आहे याचा विचार प्रत्येक तरूणाने करायला पाहिजे. आजच्या तरूणवर्गाच्या हाती उद्याच्या राष्ट्राचे भविष्य आहे. उज्ज्वल भविष्याची ज्योत तरूणांच्या हाती देऊन

देशाचा उद्धार करण्याची हिंम्मत त्यांच्यात निर्माण करण्याची पात्रता आपल्या समाजाने दाखविली पाहिजे तरच महात्मा गांधीजींचे सुजलाम् सुफलाम् भारताचे स्वप्न साकार होईल.

" 'हिम्मत है मर्दा तो मदद है खुदा'

'साथी हाथ बढाना'

'चलना ही जीवन है'

'आगे बढो हम तुम्हारे साथ है |'

'खुदी को कर इतना बुलंद की खुदा बंदेसे पूछे तेरी रजा क्या है ?' "

ही नवी आशा, नवी प्रेरणा घेऊन युवावर्ग पुढे सरसावला तर जगाच्या नकाशावर 'भारत' महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही. यासाठी विश्वास, जिद्द, साहस, प्रेम, पराक्रम, श्रम, निष्ठा, श्रध्दा, इत्यादींची आवश्यकता आहे. तेव्हा आपल्या समाजातील तरूणांचे हे स्वप्न निश्चितच साकार होईल.

**❖ सांस्कृतिक वारसा जपण्याची तळमळ: -**

मानवी जीवनात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक या घटकांना जितके अधिक महत्त्व आहे तितकेच सांस्कृतिक या घटकालाही महत्त्व आहे. संस्कृतीचा संबंध संपूर्ण मानवी जीवनाशी, समाज जीवनाशी निगडित असतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मानव आपली प्रगती करीत असतो. कधी निसर्गाशी झगडत तर कधी निसर्गावर मात करून जीवन जगत असतो. आपला जीवनोत्कर्ष करीत असतो. या जीवन उत्कर्षास अनुकूल असे बदल घडवून आणत असतो. मानव आपल्या उपजिविकेसाठी विविध व्यवसाय करतो. मनुष्य हा निसर्गातील बदलाप्रमाणे बदलत असतो. आपले जीवन समृध्द करण्यासाठी तो सतत झगडत असतो. मानवी मनावर निसर्गसृष्टीचे संस्कार होतात.

हे संस्कार कळत - नकळपणे होत असतात. यावरून श्रीमती इरावती कर्वे संस्कृतीची व्याख्या अशी करतात, 'मनुष्य समाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी सृष्टी म्हणजे संस्कृती' ही संस्कृती परंपरेने मानवाला प्राप्त होत असते. संस्कृती कुणा एका व्यक्तीची नसून संपूर्ण समाजाची असते. व्यक्तीचे जीवन मर्यादित स्वरूपाचे असते तर समाजाचे जीवन प्रदीर्घ असते, मोठया प्रदेशावर विस्तारलेले असते. जुनी माणसे मरतात, नवी माणसे जन्माला येतात ही नवी माणसे जुन्या माणसांच्या सामाजिक

परंपरा घेऊनच आपल्या जीवनक्रमाला लागतात. संस्कृती ही व्यक्तीच्या आयुष्याची दिशा निश्चित करत असते तर व्यक्ती युगधर्माला आणि देशकालाला अनुसरून संस्कृतीचा प्रवाह बदलत असते. थोडक्यात, लोकांची जीवन जगण्याची विशिष्ट देशकालपरिस्थितीनुसार असणारी पध्दती म्हणजे संस्कृती होय.

शेती करणारा शेतकरी हा निसर्गावर अवलंबून असतो. या निसर्गाचा परिणाम मानवाच्या अंतर्मनावरही होत असतो. त्यातूनच त्याच्यावर संस्कार घडत असतात. या संस्कारातूनच संस्कृतीची निर्मिती होते. ही संस्कृती काळाप्रमाणे बदलत असते तरीही मानव आपली परंपरा जपत असतो. मानवाने जीवन जगताना काही रीतिरिवाज, रूढी निर्माण केल्या आहेत. काही परंपरा मान्य केल्या आहेत. या रूढी, परंपरा जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे संक्रमित होत असतात. या पारंपरिक रूढी परंपरांचा काही अंश संस्कृतीमध्ये येत असतो. काळाबरोबर संस्कृतीची जडणघडण होत असते.

आज तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने कितीही प्रगती केली असली तरी आपली संस्कृती तो जपत असतो. विज्ञानाच्या एकविसाव्या शतकात पदार्पण केले असले तरी सांस्कृतिक मूल्यांना तितकेच महत्त्व आहे हे विसरून चालणार नाही. परंपरागत चालत आलेला आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्याचा माणूस सतत प्रयत्न करीत असतो. शहरापेक्षा ग्रामीण भागात आजही परंपरेने चालत आलेली संस्कृती जतन केली जात आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. प्राचीन काळापासून ग्रामीण समाजात प्रचलित असलेल्या जुन्या परंपरा आजही दिसून येतात.

आपला सांस्कृतिक वारसा पुढे चालविताना ग्रामीण माणसाची असलेली तळमळ 'बारोमास' या कलाकृतीतून दिसून येते. विदर्भातील प्रातिनिधिक खेडे 'सांजोळ' मधील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक त्याचबरोबर सांस्कृतिक घटकांचा मागोवा लेखकाने घेतलेला दिसून येतो. लेखकाने ग्रामीण संस्कृती विशेषत: कृषिसंस्कृती जपण्याचा प्रयत्न केलेला दिसत आहे. लेखक ज्या ग्रामीण मातीत जन्मला, ज्या ग्रामीण मातीत वाढला त्या ग्रामीण मातीचेच संस्कार लेखकाच्या मनावर झालेले आहेत. ती ग्रामीण संस्कृती, कृषिसंस्कृती लेखकाने बारोमासमधून व्यक्त केली आहे.

निसर्गाशी जवळीकता, निसर्गाविषयी कृतज्ञता व आदर बाळगणे त्यांना पवित्र मानणे या सर्व भावना सणावारांच्या, व्रताच्या, रूढीपरंपराच्या निमित्ताने व्यक्त होतात. ग्रामीण समाज हा परंपरागत, रूढीगत पध्दतीनें जीवन जगत असतो. परंपरेने चालत आलेले विशेष म्हणजे संस्कृती. काही रीतिरिवाज, परंपरा, सांस्कृतिक सण,

उत्सव, म्हणी, काही वाक्प्रचार या माध्यमातून संक्रमित करीत असतो.

ग्रामीण मातीचा मुख्य घटक म्हणजे शेतकरी. हा शेतकरी ग्रामीण संस्कृती आणि निसर्ग यांच्याशी निगडित असतो. शेतकऱ्यासाठी पेरणीचा हंगाम म्हणजे एक प्रकारचा उत्सव असतो. शेतकरी आपल्या शेतीला काळी आई मानतो. या काळया आईवर त्याचे सर्वस्वी जीवन अवलंबून असते. पेरणीच्या अगोदर शेतकरी या काळया आईची मनोभावे पूजा करतो. तिफन पूजन करतो. सुगीच्या वेळी खळयाचे पूजन करतो. पहाटे वासुदेवाची फेरी आली की शेतकरी शेतातल्या कामासाठी तयार होत असतो. दिपावली पासून शिमग्यापर्यंत शेतात राबत असतो.

ग्रामीण भागात आजही जादूटोणा, मंत्र - तंत्र, पिशाच्च, राखणदार, अंधश्रध्दा या गोष्टींना महत्त्व आहे. लेखकाने बनुबासारखा देवऋषी साकार करून ग्रामीण भागातील अंधश्रध्दा दाखवून दिली आहे. सामाजिक जीवन जगताना समाजाने काही रूढी, परंपरा समाजात निर्माण केल्या आहेत. या रूढीप्रमाणेच ग्रामीण माणूस जगत असतो. उदा. जेव्हा कोणतीही स्त्री सून म्हणून जेव्हा ग्रामीण भागात जाते तेव्हा तिला वडिलधाऱ्या माणसांच्या पाया पडावे लागते. शिवाय पाया पडताना डोक्यावर पदर घ्यावा लागतो. हे शेवंतामायच्या बोलण्यातून सूचित होते. 'पाया पडताना डोक्शावरून कपाळभरून पदर घेतला पाह्यजे.'[१७] मुलीने घटस्फोट घेतला तर समाज नावे ठेवतो. आप्तजण संबंध तोडतात म्हणजे मुलीचे लग्न करून दिलें की तिने सासरी जाचहाट असला तरी तेथेच नांदले पाहिजे अशी पध्दत ग्रामीण समाजात असते. यावरून स्त्रीने समाजात वावरताना रीतिरिवाज सांभाळूनच राहिले पाहिजे असा निष्कर्ष निघतो.

आजच्या आधुनिक काळात ग्रामीण लोकजीवनात धार्मिक विधीना अधिक महत्त्वाचे स्थान असते. परमेश्वरावर त्यांची अपार श्रध्दा असते. प्राचीन खेडे संतांच्या अभंग रचना, धर्म, देवाची उपासना, पूजा - अर्चा, आचार इत्यादी बाबी लेखकाने अत्यंत सूक्ष्मपणे चित्रित केल्या आहेत.

गावात दुष्काळ निर्माण होतो. हे भीषण संकट दूर करणारा आणि नवसाला पावणाऱ्या महादेवावर या लोकांची अपार श्रध्दा असते. गावदेवीला नवस करतात. गावातील साऱ्या स्त्रिया डोक्यावरून पाणी आणून महादेवाच्या पिंडीवर, मारूतीच्या डोक्यावर ओततात. 'धोंडी धोंडी पाणी दें .... हलकी हलकी जवारी दे .... साळ सुके, कोयड भुके .... उचकल बेंडकं पाणी बलव ऽऽ ....'[१८] अशी

परमेश्वराला विनवणी करत गावातील पोरे कमरेला लिंबाच्या डहाळया बांधून डहाळया बांधलेल्या आडव्या काडीवर बेडूक उलटे अडकवून गावभर फिरू लागतात. गावातील स्त्रिया भक्तीभावाने कपाळाला कुंकू लावून धान्य, तेल - मिरची अशा वस्तू या धोंडीवाल्यांना वाढतात. मिळालेल्या या भिक्षेतून सर्वजण मंदिरात भंडारा करतात. सारा गाव एकत्र येऊन पंगतीत बसून भंडाऱ्याचा प्रसाद घेतात. कोणीही प्रसादाला नावे ठेवत नाही. येथे त्यांची देवावर असणारी श्रध्दा दिसते.

आज एकविसाव्या शतकात विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी विशेषत: ग्रामीण माणसाची देवावर असणारी श्रध्दा ही निर्विवाद आहे असे म्हणावयास हरकत नाही.

अध्यात्मिक संस्कृतीचे दर्शन लेखकाने घडविले आहे. ग्रामीण समाजातील माणसांचे नाते हे महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतपरंपरेशी आणि पंथपरंपरेशी स्वाभाविकपणे जुळलेले असे नाते आहे. या थोर संतांनी पेरलेले विचार धन या ग्रामीण मातीतच अधिक श्रध्देने रूजविले गेले आहे. म्हणूनच इतकी वर्षे या परंपरेला होऊन गेली तरी आजही तरूणांच्या तसेच ग्रामीण माणसांच्या ओठी दृष्टांतपाठ आणि अभंग अगदी सहजपणे येतात. एकनाथसारखा तरूण लीळाचरित्रावर नितांत प्रेम करतो. लीळाचरित्रातील एक दृष्टांत देऊन लेखकाने आध्यात्मिक संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. 'कव्हणी एकु क्षुधार्थी देऊळासि ये: तवं चांदोवां आंबेयासारीखे आंबे देखे: केळांसारिखी केळे देखे: नारीएके: जांबुळासारीखी जांबुळ देखे : तीये तोडुनि खावों बैसे: तवं सेणें मातिया तोंड भरें:'[१९] या महानुभावपंथातील दृष्टांतातून आध्यात्मिकतेची ओढ जाणवते त्याचबरोबर वारकरी संप्रदायातील संतांनी जीवनाविषयी सांगितलेले ज्ञान सुभानरावांच्या ओठी सतत येताना दिसते. ते सतत परमेश्वर भक्ती करताना दिसतात. जीवनाविषयी अनास्था निर्माण होते तेव्हा लेखकाने या भावना संतांच्या अभंगातून व्यक्त केल्या आहेत.

'मन माझे चपळ न राहे निश्चल

घडी येकी पळ .... स्थीर नाई....

आता तू उदास .... नव्हे नारायणा

धाव मज दीना गांजियेले ऽऽ....'[२०]

याचाच अर्थ असा होतो की, आजही परंपरेने चालत आलेली संस्कृती माणूस जतन करीत असतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ही संस्कृती संक्रमित होत असते.

संस्कृतीत अंतर्भूत असणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे सण - उत्सव. माणूस हा जीवन जगण्यासाठी सतत धडपडत असतो. हे जीवन जगताना मानवी मनाला कुठेतरी आनंद प्राप्त व्हावा यासाठी सण - उत्सव साजरे केले जातात. हे सण - उत्सव सामुदायिकरीतीने साजरे करून संस्कृती जपण्याचा प्रयत्न माणूस करीत असतो. या साजरे केलेल्या सणामधून मानवी मनातील भावनांचा आविष्कार घडत असतो. आपल्या देशात विशेषत: ग्रामीण भागात सांस्कृतिक सण मोठया उत्साहात साजरे केले जातात. बैलपोळा, नागपंचमी, दसरा, दिपावली हे सण मोठया उत्साहाने आणि आनंदाने साजरे केले जातात. 'बारोमास' या कलाकृतीतून लेखकाने विशेषत: नागपंचमी या सणाविषयी वर्णन करून सांस्कृतिक वारसा जपण्याचा एक यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो.

समाजात सण - उत्सव यांना अनन्यसाधारण असे महत्त्व असते. स्त्री जीवनाचे भावविश्व विविध छटांनी विणलेले आहे. सुखदु:ख, वात्सल्य, प्रेम या भावनांचा आविष्कार गीतांमधून होतो. ग्रामीण भागातील स्त्रिया मांगल्य, पावित्र्य आणि श्रध्दा यांना विशेष असे महत्त्व देतात. देवधर्मावर तिची नितांत श्रध्दा असते.

शेतकरी ज्या बैलांच्या जीवावर शेती करीत असतो त्या बैलांची पोळयादिवशी अत्यंत मनोभावे पूजा केली जाते. या पोळयानंतर येणारा सण म्हणजे स्त्रियांचा नागपंचमी हा सण होय. विशेषत: स्त्रीजीवनात नागपंचमीच्या सणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मौखिक परंपरेने जतन केलेली पारंपरिक गीते आजही स्त्रिया सणाच्या दिवशी गाऊन ही परंपरा पुढे नेताना दिसतात. नागपंचमीच्या सणाला सर्व स्त्रिया एकत्रित येऊन फेर धरून गाणी म्हणतात. झाडांना झोके बांधले जातात. पंधरा दिवस अर्ध्या रात्रीपर्यंत या स्त्रिया गाणी म्हणत असतात. पंचमीच्या दिवशी 'सकरूबा' साजरा केला जातो. या सकरूबाचा नवस स्त्रिया करतात आणि नागपंचमीच्या दिवशी सकरूबा साजरा करून फेर धरून गाणी म्हणतात. या सकरूबाविषयी लेखक लिहितो, 'भामाबाईने सकरूबाचा नवस केला होता. त्यामुळे गल्लीतल्या उंबराच्या झाडाखाली नदीची चिक्कण माती वलांडल्यावरची स्वच्छ वाळू, लव्हाळीचे तुरे उन्हाळयात जमा करून ठेवलेल्या गुळगुळीत लाल काळया गुंजा, झेंडूची फुले अशी जुळवाजुळव करून सकरूबा केला'[२१] येथे संस्कृतीबरोबरच देवाविषयी असणाऱ्या श्रध्देचेही दर्शन घडते.

गल्ली बोळातील सर्व स्त्रिया आपली दु:खे विसरून उत्साहाने, नव्या उमेदीने एकत्र येऊन गाणी म्हणतात. एकमेकींना कोडी घालतात. दोन - तीन गट निर्माण करून ही कोडी घातली जातात. या दिवशी स्त्रियांच्या आनंदाला पारावर उरत नाही.

आपल्या मैत्रिणीसोबत गाणी म्हणत असलेल्या स्त्रियांचे एक वेगळे रूप पहायला मिळते. आपले मन मोकळे करण्याचा नागपंचमी हा सण सर्व स्त्रियांना खूप आवडतो. सर्व घरच्या स्त्रिया एकत्रित येऊन जिवाभावाच्या गोष्टी करतात. त्यांचे मन हलके होते. त्यामुळे या सणांना खूप महत्त्व असते. लेखकाने नागपंचमीच्या सणाचे वर्णन करून सांस्कृतिक वारसा जपला आहे.

उदा. गल्लीत फेर धरून नाचणाऱ्या बायकांचा आवाज लय धरून घुमत होता. एक गट गाण्यातून दुसऱ्या गटासाठी सवाल टाकायचा.

'कोणाले लावत होती ?

कोणाले पुसत होती ?

कोणाच्या मुखाकडे पाहून ती हसत होती ?

दुसरा गट आणखी निरगाठ मारून ठेवायचा.

एकाले लावत होती.

एकाले पुसत होती.

एकाच्या मुखाकडी पाहून ती हसत होती....

लगेच तिसरा गट कोडं उलगडणारी कलात्मक कलाटणी द्यायचा.

कुकाले लावत होती....

काजळाले पुसत होती....

आरशाच्या भिंगाकडी पाहून ती हसत होती ऽऽ'[२२] असं कोडयाचं उत्तर मिळताच साऱ्या स्त्रिया मनोक्तपणे हसतात. या स्त्रियांना आपले कुंकू अखंड रहावे अशी मनापासून इच्छा असते. या पंचमीच्या गाण्यात भावुक मन उमजते. त्याचबरोबर देवावर असणारी श्रध्दाही या स्त्रिया आपल्या गाण्यातून व्यक्त करतात.

'भल्लेही महादेवा ऽऽ भल्लेही पारबती ऽऽ

गोडीले आर्थ किती ऽऽ शब्द येती ऽऽ'[२३]

एकमेकीच्या हातात हात गुंफून गोल रिंगण करून या स्त्रिया गाणी म्हणतात, नाचतात. वातावरण अगदी उत्साहाने भरून जाते. 'बारोमास' या कलाकृतीतून लेखकाने ग्रामीण माणसाच्या जीवनातील सांस्कृतिक सणाचे महत्त्व पटवून दिले आहे.

गरीब माणूस सण आपल्या ऐपतीनुसार साजरे करीत असतो. दुष्काळामुळे शेतकऱ्याची वाताहत झालेली असते. त्यामुळे शेतकऱ्यांना घरची दिवाळी बेसन भाकरी खाऊन साजरी करावी लागली तर एका दिव्याने घरात पूजन केले जाते कारण त्यावेळी घरात लक्ष्मीच नव्हती. वर्षभरात सण आले कसे आणि गेले कसे हे शेतकऱ्यांना कळलेच नाही. नागपंचमी हा सण झोक्यामुळे, पोळा हा सण बैल धुतल्यामुळे तर दसरा हा सण गल्लीत चार - दोन घरी पाया पडायला गेल्यामुळे लक्षात राहतो.

ग्रामीण माणसाच्या जीवनात कितीही संकटे आली तरी तो आपली संस्कृती जतन करीत असतो. आजच्या काळात तिचे स्वरूप बदलले तरी संस्कृती जपली जात आहे याची जाणीव लेखकाने 'बारोमास' मधून करून दिली आहे.

नागपंचमी या सणादिवशी गायलेल्या गाण्याचे सांस्कृतिक संक्रमण होत असते आणि ही संस्कृती प्रवाही राहते. ग्रामीण माणूस हा संस्कृती जगत असतो. ही संस्कृती जगत असताना - म्हणी, वाक्प्रचार ग्रामीण जीवनात ते प्रचलित असतात. म्हणी आणि वाक्प्रचार यांच्यामागे एक विशिष्ट अशी परंपरा असते.

**वाक्प्रचार:** - 'तुले एकदम दारात पाह्यलं, अन् घटकाभर माहं काळीजच हाललं बाप्पा!'

**म्हणी:** - 'पळसाला पाने तीनच', 'सतरा कारभारी अन् ज्यो त्यो पायखोरी', 'घरोघरी मातीच्याच चुली', 'चोर च्या चोर अन् शिरजोर', 'आपलेच ओठ आणि आपलेच दात'.

ग्रामीण लोकांच्या जीवनातील विविध अनुभव त्यांच्या पाठीमागे असतात. ग्रामीण लोकजीवनाचे विविध पैलू या म्हणीतून आणि वाक्प्रचारातून पहावयास मिळतात. सामाजिक - सांस्कृतिक जीवनाचा सुंदर मिलाप 'बारोमास' मध्ये केला आहे. या सामाजिक व सांस्कृतिक जीवन चित्रणाविषयी डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, "बारोमास कादंबरीत सदानंद देशमुख समाजचित्रणाच्या, संस्कृती दर्शनाच्या बाबतीत मराठी कादंबरीत एक पाऊल पुढे गेलेले दिसतात."[२४]

आधुनिक काळात संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे. विशेषत: शहरी जीवनपध्दतीमध्ये संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे. परंतु आजही ग्रामीण भागात संस्कृतीचे दर्शन घडते. दारासमोर असणाऱ्या तुळशीची नित्य नियमाने पूजा करणाऱ्या शेवंतामायसारख्या कितीतरी स्त्रिया ग्रामीण भागात दिसून येतात ही बाब महत्त्वाची वाटते.

भारतीय संस्कृतीत साजरे होणारे विविध सण हे भावानुबंधाचे, सांस्कृतिकतेचे प्रतीक आहे. सांस्कृतिक वारसा जपण्याची ही तळमळ लेखकाने अत्यंत

सूक्ष्म रीतीने रेखाटली आहे. प्रत्येक वर्णनात त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, अभ्यासूवृत्ती दिसून येते.

### ❖ 'बारोमास' चे वाङ्मयीन श्रेष्ठत्व: -

**प्रास्ताविक: -**

समाजातील विविधांगांना स्पर्श करणारी 'बारोमास' ही कादंबरी २००२ साली प्रकाशित झाली. ही कादंबरी २४ भागात विभागली असून एकूण पृष्ठसंख्या ३४९ एवढी आहे. यावरून कादंबरीच्या व्यापकतेची कल्पना येते. ही कादंबरी संपूर्ण ग्रामीण जीवनावर आधारलेली आहे. कादंबरीचे मुखपृष्ठ आकर्षक वाटत नसले तरी मुखपृष्ठावरूनच कादंबरीचा आशय चटकन लक्षात येतो. मुखपृष्ठावरील हताश होऊन ओंडक्यावर बसलेला तरूण, शेती, शेतकरी व त्याची पत्नी, गाडीचे अर्धवट मोडके चाक, आभाळ, वठलेला वृक्ष, सुटकेस घेऊन जाणारी पाठमोरी स्त्री पाहून मन अस्वस्थ होते. ही कलाकृती सामाजिक वेदनांचा दस्तऐवज तर ठरली आहेच पण वाङ्मयीन दृष्टयाही तिचे श्रेष्ठत्व अनन्यसाधारण असे आहे.

वाचकांच्या अंतर्मनात खळबळ माजविणारी मन अस्वस्थ करणारी बारोमास ही कलाकृती म्हणजे ग्रामीण कादंबरी वाङ्मयाला लाभलेली प्रादेशिकतेची किनार होय. 'बारोमास' ला २००४ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला यावरूनच तिची प्रगल्भता लक्षात येते. लोकसत्ता पुणे, साप्ताहिक सकाळ या वृत्तपत्रांनी बारोमासची योग्य अशी दखल घेतली आहे. या कादंबरीने अस्सल ग्रामीण जीवनाचे अंतरंग उलगडून दाखविले आहेत. 'बारोमास' चे कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, निवेदन, संवादनिर्मिती, भाषाशैली, उपमा, प्रतिमा, वाक्प्रचार, म्हणी, बोलीभाषा या वैशिष्टयांनी अधिक आकर्षक झाली आहे. ही वैशिष्टये लेखकाच्या लेखनाचे वेगळेपण सिध्द करतात.

प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे सदानंद देशमुख यांनी आपल्या ग्रामीण जीवनानुभवाची शिदोरी घेऊन बारोमास ही कादंबरी साकारली. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सदानंद देशमुखांनी शेतकऱ्यांच्या व्यथा पाहिल्या होत्या. स्वत: अनुभवल्या होत्या. 'बारोमास' च्या बीजभूमीबद्दल देशमुख लिहितात, "शेतकऱ्याच्या जीवनाला बारोमास वेढून असणाऱ्या जन्मजात हुंकारातून ही कादंबरी आकाराला आली आहे."[२५] सदानंद देशमुखांच्या लेखणीचे प्रेरणास्थान त्यांच्या सभोवतालचा ग्रामीण परिसर हा आहे. आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत पण या लेखकाचे पाय अजूनही आपल्या ग्रामीण मातीतच रूतलेले आहेत. विदर्भातील बोलीभाषेतील

शब्द वापरून कादंबरीचा मळा हिरवागार केला आहे. वाक्प्रचार, बोलीशब्द, संवाद, म्हणी, भाषेची धाटणी यातून वऱ्हाडी भाषेचा मोहक, मधाळ आणि रसाळ असा बाज चढविला आहे. भाषावैभवाने कादंबरी अधिक श्रीमंत झाली आहे. सदानंद देशमुखांच्या लेखनशैलीने मराठी ग्रामीण भाषेला माधुर्य प्राप्त करून देऊन एक गोडवा वाचकांना अनुभवण्यास दिला आहे. " 'तहान' आणि 'बारोमास' मधील भाषा आणि शैलीही अस्सल ग्रामीण आहे. निवेदनात नागरी आणि संवादात वैदर्भी बोली असा मेळ लेखकाने कौशल्याने घातला आहे. ओळीतले अनेक शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचा चपखल वापर त्यांनी केला आहे. या दोन कादंबरीतून बोलीचा एक छोटासा कोशच तयार होऊ शकतो. हे तिचं एक वैशिष्टय आहे. या कादंबरीमुळं वास्तवपूर्ण कृषिप्रधान मराठी कादंबरीचं एक पाऊल पुढं पडलं आहे यात शंका नाही."[२६] असे विधान 'साप्ताहिक सकाळ' या वृत्तपत्राने केले आहे ते अगदी समर्पक आहे.

लेखकाच्या लेखनशैलीवरून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होत असतो. या संदर्भात मं. द. हातकणंगलेकर म्हणतात, " 'Style is the man' शैली हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होय"[२७] सदानंद देशमुख यांची लेखनशैली ही एका प्रतिभावंत लेखकाची आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या लेखनातून होत आहे. ग्रामीण जीवनातील अनुभवाचे कण्निकण आपल्या लेखणीने टिपलेले आहेत.

**कथानक: -**

कथानक हे कादंबरीचे मुख्य सूत्र असते. कथानकाच्या माध्यमातून विषय मांडला जात असतो. घटना - प्रसंगांची निर्मिती करून कथानक फुलविले जाते. कादंबरीचे कथानक व्यक्तिरेखांच्या संवादातून वेग घेत जाते. 'बारोमास' चा नायक 'एकनाथ' च्या पराभवाची गाथाचं लेखकाने कथन केली आहे. दारिद्र्याच्या आगीत होरपळणाऱ्या शेतकऱ्याच्या कष्टप्रद जीवनाचा आलेख लेखकाने अतिशय प्रभावीपणे रेखाटला आहे. मुख्य कथानकाबरोबर कादंबरीत उपकथानकही आहे. मुख्य कथानकाला ते पूरक आहे.

'बारोमास' या कादंबरीच्या कथानकाला अनेक कंगोरे आहेत. 'सांजोळ' गावातील एकनाथ या मराठी विषयात एम्. ए. बी. एड्. झालेल्या तरूणाची दर्दभरी कहाणी चित्रित केली आहे. ही दर्दभरी कहाणी आजच्या ग्रामीण भागातील प्रत्येक सुशिक्षित बेकार तरूणांचीच कहाणी आहे. कादंबरीचे कथानक प्रारंभीच आकर्षित करून घेते. नाटयमय प्रसंगाची कलात्मक सुसंगत अशी कथानकाची निर्मिती केली आहे. कादंबरीतील संघर्षचित्रणामुळे पात्रे जिवंत वाटतात. पात्रांमुळे

कथानकाला गती मिळाली आहे. मानवी स्वभावावर प्रकाश टाकून मूल्यांविषयीची वाचक रसिकांची जाणीव सजग केली आहे. कथानकाच्या केंद्रस्थानी 'मूल्यसंघर्ष' आहे. कथानकाचा मुख्य विषय शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे चिंतन असला तरी या विषयाभोवती अनेक विषय गुंफलेले आहेत. उदा. सुशिक्षित तरूणांच्या जीवनाची परवड, स्त्रियांच्या व्यथा, राजकारण, सामाजिक प्रश्न, शैक्षणिक प्रश्न इ. विषयांची उकल कथानकात केलेली आहे. काही ठिकाणी लेखकाच्या पाल्हाळिकपणामुळे कथानक रेंगाळल्यासारखे वाटते. असे काही दोष सोडले तर कथानक वाचकाच्या मनाची चांगलीचं पकड घेते. डॉ. रंगनाथ पाठारे लिहितात, "आजच्या खेडयातील शेतकऱ्यांच्या विस्कटत चाललेल्या वास्तवाच्या व्यापक पटावर 'बारोमास' उभी आहे. भाषेच्या आंतरिक लयीवर पक्की मांड ठेवून आशयाच्या घनतेचा भक्कम प्रत्यय ती देतेचं; खेरीज आपली भूमी आणि भाषा यांच्याशी ती घट्ट बांधलेली असल्याने त्यांच्या अतीत होण्याची लक्षणेही प्रकट करते; हे तिचे अत्यंत महत्त्वाचे यश आहे"[२८]

कादंबरीचा आवाका मोठा असल्याने सामाजिक - आर्थिक - सांस्कृतिक या सर्व घटकांना कथानकाने सामावून घेतले आहे. कथानकाविषयी डॉ. एस. एम. कानडजे लिहितात, "....ही कादंबरी कृषी जीवनाचे, त्या जीवनातील समकालीन वास्तवाचे तपशीलवार चित्रण करते. हे चित्रण ठोस आणि भरीव आहे. समकालीन समग्र जीवनपट तिने कवेत घेतला आहे.... शेतकऱ्यांचे खडतर, हतबल जीवन आणि त्या जीवनाला विळखा घालून बसलेली राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती यांचे परस्परसंबंध कथात्म पातळीवर उलगडून दाखविणे हे खरे तर मोठेच वाङ्मयीन आव्हान होते. पण सदानंद देशमुखातून समर्थ व प्रतिभाशाली कादंबरीकाराने ते लीलया पेलल्याचा प्रत्यय कादंबरी वाचनानंतर येतो."[२९] कथानकाचा शेवट सुभानरावांच्या सूचक आत्महत्येने केला आहे. हा शेवट परिणामकारक झाला आहे. कादंबरीचे कथानक वाचकाच्या मनात कायमचे घर करून राहील यात शंका नाही.

**व्यक्तिरेखा: -**

व्यक्तिरेखा या कादंबरीच्या कथानकाचे महत्त्व वाढवतात. कथानकाला अर्थ आणि मूल्य प्राप्त होते ते व्यक्तिरेखामुळेच. कादंबरीत प्रमुख पात्राबरोबर गौण पात्रेही तितकीच महत्त्वाची असतात. या कादंबरीत प्रमुख गौण व्यक्तिरेखाबरोबर बऱ्याच व्यक्तिरेखा अप्रत्यक्षरीत्या कादंबरीत येऊन जातात. या व्यक्तिरेखामुळे कथानकास एक वेगळे वळण मिळाले आहे. कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा स्वत:चा असा एक ठसा उमटवून जाते. प्रत्येक व्यक्तिरेखा ठसठशीत आणि जिवंत वाटते. एकनाथची व्यक्तिरेखा अत्यंत प्रभावी वाटते. व्यक्तिरेखांच्या मनाचे सूक्ष्म पदर अगदी सहजपणे

उलगडून जातात. कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा वेगवेगळया स्वभावाची आहे. भाषाशैलीतून व्यक्तिमत्त्वाची ओळख पटवून देण्याचे सामर्थ्य लेखकाच्या लेखनशैलीत आहे. कादंबरीतील प्रत्येक पात्राशी, त्याच्या जीवनाशी, विचारांशी, भाव - भावनांशी समरस होऊन लेखकाने प्रत्येक व्यक्तिरेखा रंगविली आहे.

एकनाथ, सुभानराव, शेवंतामाय, मधु, अलका, ममता वारे या प्रमुख पात्रांद्वारे कथानक फुलत जाते. व्यक्तीच्या स्वभावरचनेमुळे कथानकापेक्षा व्यक्तिचित्रणाला महत्त्व प्राप्त होते. व्यक्तिरेखांच्या कृतीतून, स्वभावातून, वागण्या - बोलण्यातून घडत जाणाऱ्या प्रसंगातून कथानक वेग घेते. संयमशील, सृजनशील, तत्त्वनिष्ठ, संवेदनशील विचारांच्या एकनाथ या व्यक्तिरेखेने वाचकांच्या मनात स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे. सुभानरावचा अंत मनाला बोचून जातो. शेवंतामायच्या बोलण्यात फटकळपणा, कडवटपणा जाणवत असला तरी परिस्थितीची जाण तिला चांगलीच आहे. फटकळपणा हा तिचा स्वभावधर्म आहे पण त्यामागे तिची वृत्ती चांगले व्हावे अशी आहे. 'पाया पडताना डोक्शावरून कपाळ भरून पदर घेतला पाहिजे'[३०] या बोलण्यातून फटकळपणा जाणवत असला तरी तिने भारतीय संस्कृती जपली आहे. अलकाचे कादंबरीत स्थान मर्यादित असले तरी तिचा स्पष्टोक्तेपणा लक्षात राहतो. मधुच्या वागण्या - बोलण्यातून त्याच्या बंडखोर, उर्मट तसेच विध्वंसक स्वभावाचे दर्शन घडते. समाजामध्ये वास्तवात असणाऱ्या व्यक्तिरेखाच कादंबरीत उभ्या केल्या आहेत. प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष व्यक्तिरेखांची रेलचेल झाली आहे. प्रत्येक व्यक्तिरेखा त्यांच्या स्वभाववैशिष्टयाने त्यांचे जीवन जगण्याच्या पध्दतीने, जीवनाशी केलेल्या अथक संघर्षामुळे आपल्या मनावर चिरकाल ठसतात. कादंबरीतील पात्रांनी आपल्या मनावर जो परिणाम केला आहे तो लवकर पुसला जात नाही. त्यांच्या प्राक्तनाबद्दल अनेक प्रश्न मनात गर्दी करतात आणि आपल्याला विचार प्रवृत्त करतात. हेच कादंबरीचे यश आहे.

**वातावरणनिर्मिती: -**

कादंबरीत व्यक्तिरेखाइतकेच 'वातावरण' या घटकाला महत्त्व असते. वातावरणनिर्मितीमुळे कादंबरीला पार्श्वभूमी प्राप्त होत असते. कथानकाला अनुरूप अशी वातावरणनिर्मिती केली जाते. कथानक आणि व्यक्तिदर्शनाला उठावदारपणा प्राप्त करून देते. 'बारोमास' मध्ये अस्सल ग्रामीण वातावरणनिर्मिती करून कथानकाला एक परिमाण प्राप्त करून दिले आहे. ग्रामीण वातावरणनिर्मिती करण्याचे लेखकाकडे कसब तर आहेच पण शहरी वातावरणनिर्मितीही करताना लेखक कुठेही कमी पडला नाही. कथानकाला, प्रसंगाला अनुकूल अशी वातावरणनिर्मिती केल्याने

प्रसंग जसेच्या तसे डोळयांसमोर उभे राहतात.

उदा. गुप्तधन शोधण्यावेळचा प्रसंग, अलका आणि शेवंतामाय यांच्या भांडणाचा प्रसंग, एकनाथच्या सासुरवाडीतील प्रसंग, मधुने अलकाच्या तोंडात मारल्याचा प्रसंग या प्रसंगाचे हुबेहूब चित्र डोळयासमोर उभे करण्यात लेखक कमालीचा यशस्वी झाला आहे.

कादंबरीतील घटना, प्रसंग अतिशय वास्तव वाटतात. शेती आणि शेतकरी यांचे भावसंबंध चित्रित केले आहेत. ग्रामीण शेतशिवार डोळयापुढे उभे राहते. निसर्गाचे बदलते ऋतुचक्र, नक्षत्र, ऊन - पाऊस, झाडे - झुडपे यांचे संवेदनगर्भ चित्र चित्रित केले आहे.

उदा. 'रात्री भन्नाट वारा सुटला. गल्लीतलं एकुलतं एक उंबराचं झाड चारी अंगाने केकादू लागलं. धुळीचे लोट गढीवरून गावभर पसरू लागले. आभाळ गाळून गाळ झालं. आभाळातल्या चांदण्या दिसेनाशा झाल्या. वातावरण असं गडद पावसाळी झालं'[३१] चित्रमय शैलीतील हे निसर्ग वर्णन अत्यंत तन्मयतेने चित्रित केले आहे.

पानाफुलांनी निसर्गाला सजीव केले आहे. उदा. '....शेताजवळून जाताना माळउतरणीवरच्या लोखंडीच्या झाडाने त्याचे लक्ष वेधून घेतले. वैशाख महिन्यात या झाडाला भरघोस फुले लागतात. फुले इवली इवली. पण हजारो फुलांचा मिळून एक घोस. आणि अशा हजारो घोसांनी ते हिरवंगार पानाचं झाड झाकून टाकलेलं'[३२] येथे निसर्गाच्या मनोहरी रूपाचे दर्शन घडते. निसर्ग वर्णन वाचताना वाचक मोहित होऊन जातो.

प्राण्यांची चित्रणेही जिवंत वाटतात. प्राण्यांचे हावभाव, लकबी, सवयी यांचे सर्वांगीण चित्रण विस्ताराने केले आहे. गाय, बैल, म्हैस, मांजर, कुत्रा, वानर या प्राण्यांचे चित्रण करून ग्रामीण परिसर चित्रित केला आहे. चंद्री मांजरीला भूक लागते तेव्हाचे तिचे हावभाव व्यक्त केले आहेत. 'चंद्रीचा कातावलेला आवाज पुन्हा जिन्यावर. जिन्यातून त्याच्या पलंगाखाली. चक्कीच्या पट्टयाच्या जोडाचा आवाज पुलीवर लयदार येत रहावा. तसं तिचं ओरडणं. कायम गतिमान. रडतच होती सारखी.'[३३]

गाय - म्हैस विकली तेव्हाचे बैलांच्या वागण्यातील बदल अत्यंत सूक्ष्मपणे टिपले आहेत.

उदा. 'माणसांनी आपले दावे पुतनी गायीच्या अन् गबताळया म्हशीच्या गळयाला लावले. हातातले दावे ते पुढे ओढू लागले अन् गाय - म्हैस गळयाला ताण देऊन

माणसांना मागे ओढू लागले. पुतनी गाय तर घोगऱ्या आवाजात भयानक हंबरू लागली.'

'तिची ती अवस्था पाहून गोठयात बांधलेले गुलब्या - पुण्या, सुकऱ्या - बावऱ्या असे चारही बैल डोळे वटारून रागाने माणसाकडे पाहू लागले. त्यांच्या नाकातल्या वेसणीला ताण पडून नाकातोंडातून फेसकट अन् डोळयातून पाण्याच्या धारा गळू लागल्या. तेही व्याकूळ आवाजात लागोपाठ हंबरू लागले आणि ढोरांच्या आरडा - ओरडीने वाडयात एकच कालवा झाला.'[३४]

प्रत्येक प्रसंग आपल्या मन: चक्षूसमोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. प्रत्येक प्रसंगनिर्मितीतून लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा प्रत्यय येतो. ग्रामीण जीवनाप्रमाणेच शहरी जीवन उभे करण्याची ताकद नायकाच्या निवेदनातून स्पष्ट होते. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाबरोबरच नायकाच्या मनातील वेदनाही व्यक्त होताना दिसतात. 'खेडयात जन्माला येणं म्हणजे सनातन काळातील अस्पृश्याच्या घरात जन्माला येणं. पण कुठे जन्माला यावं हे काही कोणाच्या हाती नसतं.'[३५] प्रसंगानुरूप वातावरणनिर्मिती करून स्थलकालाचे वास्तवदर्शी चित्रण प्रभावीपणे केले आहे. वातावरणनिर्मितीमुळे कादंबरीला एक वेगळाच आयाम प्राप्त झाला आहे.

**निवेदन: -**

निवेदन कादंबरीला गती प्राप्त करून देते. कादंबरीच्या कथानकाची परिणामकारकता कथनपध्दतीवर अवलंबून असते. लेखकाला निवेदन कौशल्याने करावे लागते. कादंबरीचे निवेदन प्रामुख्याने स्वमुखी, पात्रमुखी आणि पत्रात्मक कथन याद्वारे केले जाते. लेखक आपली कथा ज्या प्रकाराने सांगतो त्यास कथानकाची निवेदनपध्दती किंवा कथनपध्दती म्हणतात. सदानंद देशमुख यांनी बारोमास ही कादंबरी पात्रमुखी निवेदनपध्दतीने लिहिली आहे. या कादंबरीचा नायक एकनाथ तनपुरे हा संपूर्ण कादंबरीची कथा सांगताना दिसतो. निवेदनासाठी प्रमाण भाषा व पात्राच्या संवादासाठी बोलीचा वापर केला आहे. तृतीय पुरूषी निवेदनपध्दतीचा वापर केला असला तरी प्रमुख पात्रांच्या मनातील भावना, विचार व्यक्त करताना त्या पात्रांचा एखाद्या घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्त करताना आत्मनिवेदनाच्याही पातळीवर निवेदक वावरताना दिसतो. अशा रीतीने रचनातंत्राच्या गरजेनुसार निवेदनतंत्रातही बदल केलेला दिसतो. निवेदन कथेला अनुकूल आहे. कथेच्या विकासात निवेदनाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. निवेदनाविषयी डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, "निवेदनात नागरी

आणि संवादात वैदर्भी बोली यांचा मेळ लेखकानं कौशल्यानं घातला आहे."[३६]

**संवादनिर्मिती आणि भाषाशैली: -**

मानवी व्यवहाराचे चित्रण करण्यासाठी कादंबरीत संवाद वापरले जातात. संवादातून कादंबरीचे कथानक उलगडत जाते म्हणून कादंबरी वाङ्मयात संवाद फार महत्त्वाचे असतात. व्यक्तिरेखांचे स्वभावदर्शन, त्यांची वृत्ती - प्रवृत्ती संवादातून समजते. संवादामुळे कथानकाची रंगत वाढते. बारोमासमधील संवाद अतिशय बोलके आणि जिवंत आहेत. संवाद अतिशय गतिमान आहेत. बोलीभाषेतील संवाद वैशिष्टयपूर्ण आहेत. शेतकऱ्याच्या मनातील अस्वस्थता दाखविणारा पुढील संवाद आहे.

'कारे, कुणीकडी आला व्हता ?'

मागून आवाज आला तसा एकनाथ थांबला.

'मले वाटलं झोपले का तुमी' तो मागे परतून आला.

'मेलो आसं त वाटलं नाई नं ?'

'आसं कसं म्हन्ता काका, मले कशाले तसं वाटीलं'

'नाई, त्योच टैम आला आता. एक त बोकांडी महामूर कर्ज झालं. सवाई दिढीचं. ते काढून पेरणी केली. अन् आता, बखाड पडून सम्दी पेर ऊलटली. मंग जहेर घेऊ नाई त काय करावं ? माणूस भुलते सम्दं. पण कवा वावरत कामंधामं आसतील त. पण आता त कामच उरले नाई. मोडीचं वावर एकसरणी दुण्णी ढाळून घेतलं आता का नांगर धरावं भर बरसातीत ?'[३७]

कादंबरीचा प्रदेश हा विदर्भातील असल्याने कादंबरीतील संवाद प्रादेशिकतेतून वैदर्भीय बोलीतून प्रकट होतात. संवादातून ग्रामीण संस्कृतीचे तसेच ग्रामीण व्यक्तींचे व्यक्तिमत्त्वही प्रकटते. संवाद अतिशय कौशल्यपूर्ण आहेत. संवादलेखनात कुठेही आक्रस्ताळेपणा दिसत नाही. काही संवादासाठी हिंदी भाषा वापरली आहे.

उदा. एकनाथ आणि कादरभाई यांच्यातील संवाद पहा.

'क्युबे एकनाथ ? कोण गुजर गया तेरे घरमें का ?'

तसा एकनाथ भयानक चिडला.

'आरे जावं न चुपचाप.....क्यो मारते किसको. हमारे घरमेकोंकू !'[३८]

कादंबरीतील संवादात कुठेही बोजडता वा कृत्रिमता जाणवत नाही. संवाद

पात्रानुकूल असून कथानकाला पुष्टी देणारे आहेत.

**भाषाशैली: -**

कोणत्याही कलाकृतीच्या वाङ्मयीन सौंदर्याचा अभ्यास करताना प्रामुख्याने त्या कलाकृतीच्या भाषाशैलीचा विचार केला जातो. भाषा आणि शैली हे वाङ्मयाचे परस्परपूरक आणि अविभाज्य घटक आहेत. शैलीविषयी रा. ग. जाधव लिहितात, "साहित्यकृतीतील आशयाचा आविष्कार कसा झाला हे शैलीवरून समजते."[३९] लेखकाच्या भाषाशैलीवरून लेखकाचे व्यक्तिमत्व स्पष्ट होते.

साहित्यामध्ये भाषा हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. लेखक जेथे जन्माला येतो, ज्या वातावरणात वाढतो तेथील संस्कार त्याच्या मनावर झालेले असतात. तेथील संस्कृती, वातावरण, बोली याचा परिणाम त्याच्या साहित्यावर होत असतो. ग्रामीण मातीविषयी ओढ आणि या ओढीतून निर्माण झालेली 'बारोमास' या कलाकृतीच्या भाषेला ग्रामीण मातीचा गंध लाभला आहे. कादंबरीची भाषाशैली ओघवती आहे. ही कलाकृती अतिशय सकस अशी ग्रामीण कलाकृती आहे. ओल्या सुक्या ग्रामीण परिसरातून निर्माण झालेल्या 'बारोमास'ची भाषा ही ग्रामीण वैदर्भीय संस्कृतीला शोभेल अशीच आहे. लेखकाने समाजवास्तवाचे चित्रण ग्रामीण भाषेतून चित्रित केले आहे. लेखकाने वापरलेली भाषा मनाचा वेध घेते. कादंबरीची भाषा अधिक परिणामकारक आहे. वैदर्भीय बोली कायमची लक्षात राहील.

उदा. "माह्या लेकीनं कधी दोन पैशाचा तरास देला नाई लगन झाल्यापासून. निगुतीनं आपला चटणी - भाकरीचा संसार केला. आता तिच्या गळयालोकच आलंत आमचा नाय त कोणाचा आधार मांगल ती ?"[४०] शेवंतामाय म्हणाली.

ग्रामीण जीवनातील सुख - दु:खांचा वेध घेणारी अशी त्यांची ग्रामीण बोली आहे. ग्रामीण माणसे 'जिवंत' स्वरूपात साकारण्यासाठी ग्रामीण बोलीचा वापर केला आहे. ग्रामीण बोलीबरोबर अनेक ठिकाणी ग्रामीण शब्दांचाही वापर केला आहे.

उदा. आलप, कोंगाया, सायड, खिजरू, कांगरीबया, आरकट, चरिंतर, असे अनेक ग्रामीण शब्द वापरून भाषेचे सौंदर्य वाढविले आहे.

घटना - प्रसंगाची परिणामकारकता अधिक तीव्रपणे जाणवण्यासाठी उपमा, उत्पेक्षा, रूपक, प्रतिमा, प्रतिके, वाक्प्रचार यांचा वापर समर्पकपणे केल्याने भाषा अधिक प्रभावी झाली आहे.

लीळाचरित्राच्या भाषेचा वापर करून जुन्या गद्यशैलीशी नाते जोडण्याचा प्रयत्न करून एक नवीन प्रयोग केलेला आहे. एकनाथच्या मनातील भावना

लीळाचरित्राच्या भाषेत लेखक व्यक्त करतो.

उदा. 'एक तरणु: शिकेला: उच्चविद्याविभुषीत. परी तो बेकारू असे: तयाची भार्या अलकावती: परी तियेला प्रवृत्ती नसे:'[४१]

विविध ढंगातील बोलीभाषा हे कादंबरीचे वैभव आहे. हे वैभव वाचकांच्या डोळयात भरते.

**उपमा: -**

कथानकाला साजेल अशा उपयुक्त उपमांची पेरणी केल्यामुळे भाषाशैली प्रभावशाली बनते.

| | उपमा | पृ. |
|---|---|---|
| 'घरातल्या माणसांना अलकाने दिलेली उपमा | टिकोजी | ६ |
| उपरोधात्मकपणे सूनेला दिलेली उपमा | सुगरण | ९ |
| मधुच्या मित्रांना दिलेली उपमा | रताळे | ९ |
| मुक्ताला दिलेली उपमा | भिकारीण | १६ |
| गुलाबाच्या फुलाला दिलेली उपमा | नमता वारेच्या देहाची | २२ |
| घराला दिलेली उपमा | उकिरडा | ५४ |
| तलाठयाला दिलेली उपमा | जनावर | ७२ |
| सातबाराच्या कागदाला दिलेली उपमा | शेवचिवडयाचा कागद | ७५ |
| बिअरला दिलेली उपमा | घोडयाचा मूत | ८५ |
| सांजोळातल्या घराला दिलेली उपमा | खेबडे दात | १०७ |
| अलकाला दिलेली उपमा | निवडुंगाचे काटेरी झाड | १११ |
| अलकाला दिलेली उपमा | बकरी | १२३ |
| अलकाच्या देहाला दिलेली उपमा | भुई | १४१ |
| अलकाच्या नखाला दिलेली उपमा | फाळ किंवा फणाचे फारोळे | १४१ |
| बिघडलेल्या टिव्हीला सुभानरावांनी दिलेली उपमा | मढं | १६० |
| तेजराव खपकेला दिलेली उपमा | भूत | १९९ |
| खेडयातल्या बायकांना दिलेली उपमा | बाभळीच्या खोडाची | २१७ |

| | | |
|---|---|---|
| डोक्याला दिलेली उपमा | पोकळ भोपळा | २२० |
| मेंदूला दिलेली उपमा | वाळून कोळ | २२० |
| शेवंतामायने अलकाला दिलेली उपमा | चटक चांदणी | २६० |
| कास्तकार शेतकऱ्यांना दिलेली उपमा | पाखरू | २६९ |
| मार्केटवाल्यांना दिलेली उपमा | पारधी | २७२ |
| सुभानरावच्या चेहऱ्याला दिलेली उपमा | पानझड झालेल्या झाडाची | २९४ |
| महाकाळने सुभानरावांना दिलेली उपमा | चिलूट | ३०५'[४२] |

**प्रतिमा: -**

उपमा - प्रतिमासृष्टीमुळे कादंबरीची भाषा अत्यंत प्रभावी बनली आहे .

' 'तळयाच्या पाण्यात तरंग किंवा समुद्रावरच्या सारख्या येत राहणाऱ्या लाटा तसे आपल्या मनात सतत विचारांचे हेलकावे' पृ.१०९

'.....एरंडाच्या फुसक्या फांद्या काड् काड् मोडाव्यात तसा तो मनातल्या मनात मोडत गेला' पृ. १४३

'पोटऱ्यातल्या ज्वारीचा नवता धांडा कवटाळावा तशी ती त्याला कवटाळून धरू लागली' पृ.१४३

'अस सांगताना शेवंतामायच्या काळजाचा डबडब डोह झाला' पृ. १४६

'आभाळव्याकुळ डोळे चातक होऊन पुन्हा: पुन्हा वर पाहू लागले' पृ.१६३

'आक्काच्या दोन पोरी उपटून फेकलेल्या ज्वारीच्या कोमटयासारख्या झरझर सुकून गेल्या होत्या' पृ. २१३

'तो घायाळ बोचकारली भुई झाला' पृ. २२०

'पण मग तळयाचं पाणी आटत जावं उन्हाच्या झपक्यात तसं ते सगळं हळूहळू ओसरत गेलं. आणि खडक उघडा पडला' पृ. २२४

'त्याच्या डोळयांतलं आभाळ कागदावर गळू लागलं' पृ. २२८

'.....मग उकळत्या पाण्यातला उकडायला टाकलेला बटाटा वर सुळतात यावा तसा त्यांच्या पोटातला वायगोळा पीळ धरून काळजाकडे सरकायला लागला' पृ. २३१

'काळया गव्हाळीच्या शेतासारखीच शेतकऱ्यांची मनं चिबडून गेली.' पृ. २६६

'बोलता बोलताच काही हरणकाळजे डोळे पावसासोबत गळू लागले.' पृ. २७५

'....चेहऱ्यावरची उग्रता उन्हात कपडा वाळावा तशी वाळून गेली.' पृ.२८७

'.... आपलंही आयुष्य ह्या धुक्यात हरवलेल्या सृष्टीसारखचं' पृ. ३२१

.... त्याच्या पुढयातल्या रोगझडीने चिरमटून जाणाऱ्या शिवारासारखा. पृ. ३२१

'..... चेहरा तर गारपिटीत सापडलेल्या शेतासारखाचं. उजाड भग्न.' पृ. ३२८'[४३]

**म्हणी: -**

ग्रामीण जीवनातील रोजच्या व्यवहारात बोलल्या जाणाऱ्या म्हणींचा चपखलपणे वापर करून कादंबरीला अस्सल ग्रामीणतेचा साज आणि बाज चढविला आहे. या शिवाय हिंदी म्हणींचाही योग्य प्रसंगी वापर केलेला दिसून येतो. संपूर्ण कादंबरीत जवळजवळ पन्नास पेक्षाही अधिक म्हणींचा वापर केला आहे. म्हणींचा पाऊस पाडून कादंबरीचे शिवार थंडगार केल्यासारखे वाटते.

''दिसायले देखणी अन् कामाले पोकळ फुकणी' पृ. १६

'जसा संग तसा रंग' पृ. १७

'पाठीवरचा भाऊ म्हणजे असून अडचण नसून खोळंबा' पृ. २६

'फुकटात बसू दे अन् दोन दम मारू दे' पृ. ४३

'पैसा फेक मंग तमाशा देख' पृ. ४४, १७0

'ज्याचा हात मोडल त्याच्या गळयात पडल' पृ. ४९

'रातं सारी जागण अन् संकाळ पाह्यट घोरणं' पृ. ५१

'सांग पाटला काय करू उपट पऱ्हाटी पे गहू' पृ. ५२

'बारा वर्स तप केलंन् गाढवाशी पाप केलं' पृ. ५३

'नाव मोठं अन् लक्षण खोटं' पृ. ५७

'जुनं ते सोनं' पृ. ६६

'आपलचं नाही धड न् दुसऱ्याले कशाले म्हणावं जड' पृ. ९४

'काळा कोळसा कितीबी उगाळला तरी काळच उमटणार' पृ. ९६

'काम सरो वैद्य मरो' पृ. ९९

'पळसाला पानं तीनचं' पृ. १२२, १४६, १९६

'शेळीचे भाऊ शेळपट' पृ. १२३

'इकडून तिकडून वारलं अन् मंधी मुसळ मारलं' पृ. १३०

'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये' पृ. १३४

'सतरा कारभारी अन् ज्यो तो पायखोरी' पृ. १४९

'एक हात लाकूड नऊ हात झिलपी' पृ. १५६

'आयाबाया दाराशी अन् वायगोळा उराशी' पृ. १५६

'बय गेली अन् बयची वाकळबी गेली' पृ. १५९, ३४४

'कावळयाच्या शापानं कुठी गायी मरतात' पृ. १६२

'चोराच्या चोर अन् शिरजोर' पृ. १६७

'शेंडी तुटो का पारंबी तुटो' पृ. १६८

'आपलेच ओठ आपलेच दात' पृ. १६९

'धाकल्याले सरसा अन् मोठयाले निरसा' पृ. १६९

'गव्हाबरोबर किडे रगडले जातात' पृ. १७१

'तुमी तशा आमी अन् नीट बसा मामी' पृ. १७२

'दुधाची तहान ताकावर' पृ. १७९

'आडजीभ खाय अन् पडजीभ कोल्डी राय' पृ. १९३

'शिक्याचं तुटलं न बोक्याचं जुटलं' पृ. १९८

'तोंड दाबून बुक्क्याचा मार' पृ. १९८

'पळता भुई थोडी' पृ. २१५

'ज्याच्या हाती ससा त्यो पारधी' पृ. २१८

'तहान लागल्यावर इहिर खंदा' पृ. २३२

'कळतं पण वळत नाई' पृ. २३४

'हरकली बायजाबाई न बसायले जांगा नाई' पृ. २३५

'ढवळयाशेजारी पवळा बांधला अन् गुण नाईत वाण लागला' पृ. २४०

'इकडी आड अन् तिकडी इहीर' पृ. २४८

'काळ आला व्हता पण येळ आली नवती' पृ. ३०९

'करणंच नाही त डरणं कशाच' पृ. २८३

'ज्या ताटात नाक बुडेस्तोर खाल्लं त्याच ताटात हागून ठेवलं' पृ. २८७

'बुडत्या घराला काठीचा आधार' पृ. ३२२

'जशी करणी तशी भरणी' पृ. ३३२

'या हातानं करा लागते अन् त्या हातानं भरा लागते' पृ. ३३२

**हिंदी म्हणी: -**

'सौ नकटे में एक नाकवाला क्या झक् मारेगा' पृ. २४१

'एक धुंडो हजार मिलते' पृ. ३०३

'सै बका न् एक लिखा' पृ. ३०४

'जान बचाई लाखो पाई' पृ. ३१८'[४४]

कादंबरीचे सौंदर्य म्हणींनी अधिक खुलविले आहे. काही म्हणींची पुन:रावृती झाली असली तरी म्हणींचे सौंदर्य तसूभरही कमी होत नाही.

**वाक्प्रचार: -**

ग्रामीण भागात रूढ असणाऱ्या वाक्प्रचारांचा लेखनात अगदी सहजपणे आविष्कार घडला आहे.

' 'जिवाचा घोळसा करणे' पृ. ५

'काटयान् काटा काढणे' पृ. ४०

'काडीमोड घेणे' पृ. ९३

'काळजात पोकळी निर्माण होणे' पृ. ९४

'काळीज फाटून जाणं' पृ. १२५

'काळीज हालणे' पृ. १४४

'काळीज मोहरणे' पृ. १६६

'जखमेवर मीठ चोळणे' पृ. १७९

'काळजात आग लागणे' पृ. १८३

'डोळे हरवून बसणे' पृ. २३०

'काळजाला कापरं भरणे' पृ. २३९

'डोळे लावून बसणे' पृ. २४१

'ताकाला तूर लागू न देणे' पृ. २९३

'डोळे लावून घेणे' पृ. २९४

'काळजाला चरका बसणे' पृ. २९८, ३१५

'नाकीनऊ येणे' पृ. ३१९'[४५]

नादमयतेतून ती कृती शब्दमाध्यमातून अगदी हुबेहूब साकार करण्याची लकब त्यांच्या भाषेमध्ये आहे.

उदा. ' 'डचाक - डचाक करून तो तांब्याभर पाणी प्याला' पृ. २७७

'तोंडाची मचमच करत चावून खात होती' पृ. २७८'[४६]

प्रसंगाला साजेल अशा लयकारी शब्दयोजनांचा समर्पकपणे वापर केला आहे.

उदा. ' 'बांगडयाची किणकिण' पृ. ११८

'श्वासांची सळसळ' पृ. ११८

'शब्दांची फसफस' पृ. ११८'[४७]

कादंबरीतील आकर्षक अशी काव्यरचना कादंबरीला एक उंची प्राप्त करून देते. '....तुझ्या मेंदीभरल्या सुकुमार हाताने लिहून ठेवलेल्या कवितेच्या ओळी मी टिपून घेतो. तहानल्या ओठांनी'[४८] काव्य वाचताना वाचकाचे मन क्षणभर फुलून येते.

रोजच्या ग्रामीण जीवनातील शिव्यांचा अगदी सहजपणे वापर केला आहे. राग, द्वेष व्यक्त करतानाही पात्रांच्या तोंडी शिवी आलेली आहे.

उदा. भाडया, बाईलबुग्या, धांगड, नेबळट, हलकट, बेशरम.

प्रादेशिक कादंबरी म्हणूनही 'बारोमास'चे श्रेष्ठत्व दिसून येते. विदर्भातील निसर्ग, वातावरण, तेथील माणसे, त्यांची जीवनपध्दती, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण बोलीभाषा, सांस्कृतिक परंपरा, सामाजिक रीतिरिवाज, लेखकाने प्रादेशिकतेच्या अनुषंगाने मांडलेले आहेत. कादंबरी वाचताना विदर्भात वावरत असल्यासारखे वाटते.

प्रत्येक लेखकाची स्वत:ची अशी खास भाषाशैली असते. लेखकाच्या भाषाशैलीवरून लेखक कळतो. ग्रामीण लेखकाचे ग्रामीण जीवनाशी असणारे नाते हे किती प्रामाणिक आणि सच्चेपणाचे आहे हे 'बारोमास' मधील भाषाशैलीवरून पटकन लक्षात येते.

उदा. 'शेतकऱ्याच्या जातीले कुठी कटाळा असते का ? अन् कटाळा केला की आटपलाच त्याचा खेळ'[४९]

बारोमास मधील भाषाशैलीविषयी अनंत मनोहर लिहितात, " 'बारोमास' चे भाषासौंदर्य वेधक आहे. कादंबरीत पात्रांच्या तोंडी येणाऱ्या म्हणी चपखल आहेत. त्यात बोलीभाषेचा ठसका आहे आणि पिढयानुपिढयाचं शहाणपण त्यात गोठलेलं आहे. 'पैसा फेक मग तमाशा देख', 'सांग पाटला काय करू ? उपट पऱ्हाटी पेर गहू' असे सांगकाम्ये नोकर. 'च्यूंत पाहून भूत लागते.' 'बारा वर्स तप केलं. अन् गाढवाशी पाप केलं' अशा अनुभवाच्या कित्येक खाणी 'बारोमास' मध्ये भेटतात. विशेष म्हणजे बोलीभाषा उपरी वाटत नाही. रसभंग होत नाही. अर्थनिष्पत्तीच्या ती आड येत नाही. तिच्या नितळ उपयोगामुळे भाषासौंदर्यात भर पडते."[५०]

शेतकऱ्याच्या उपेक्षित जीवनावर प्रकाश टाकून नवदृष्टी देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. शेतकऱ्याच्या व्यथा, वेदनात्मक जीवन अत्यंत ताकदीने आणि कलात्मकतेने चित्रित केले आहे. सुशिक्षित, सुसंस्कारित असून जीवनाच्या स्पर्धेत अयशस्वी झालेल्या तरूणांची व्यथा लेखकाने मांडली आहे.

ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र उभे करताना लेखकाने ग्रामीण परिसराचे हुबेहूबपणे चित्र चित्तारले आहे. शेतकऱ्यांचे दारिद्रय, सुशिक्षित तरूणांच्या जीवनाची झालेली परवड त्यांचा जीवनसंघर्ष यांचे अकृत्रिमपणे विवेचन केलेले आहे.

चित्रमय शैलीमुळे व्यक्तिरेखा आपल्या डोळयासमोर जिवंतपणे उभ्या राहतात. शेत - शिवार, निसर्ग वाचकांच्या डोळयासमोर मूर्तिमंत उभा ठाकतो.

कोरडया दुष्काळामुळे शेतकऱ्यांची, पशु - पक्ष्यांची झालेली होरपळ हृदयाला चटका लावून जाते. ग्रामीणजीवन संघर्ष चित्रित करण्यासाठी लेखकाने उत्कृष्ट भाषाशैली वापरली आहे.

'बारोमास या कलाकृतीबाबत विविध समीक्षकांनी मांडलेली मते

**१. प्रा. मेधा काळे: -**

" 'बारोमास' हे शीर्षकही समर्पक आहे. मात्र कधी कधी जागतिकीकरण, शिक्षणसंस्थेतील भ्रष्टाचार याविषयी चर्चा पाल्हाळीक वाटते. लेखक आपली मते व्यक्त करीत आहे असे वाटते. मुखपृष्ठही थोडे अधिक आकर्षक असायला हवे होते. अशा काही गोष्टी सोडल्या तर एकविसाव्या शतकात प्रवेश केलेल्या भारतातील ग्रामीण शेतकऱ्याचे अत्यंत वास्तव व दयनीय चित्र रेखाटण्यात लेखक कमालीचा यशस्वी झाला, असे म्हणता येते. मराठी साहित्यात मोलाची भर या कादंबरीने टाकली आहे. व्यक्ती - व्यक्ती, व्यक्ती - समाज, व्यक्ती - निसर्ग, व्यक्ती, - नियती यांच्यातला मानसिक संघर्ष व्यक्त करीत अवघा समाज ही कादंबरी आपल्या कवेत घेते. वाचकाला झपाटून टाकते"[५१]

**२. डॉ. प्रल्हाद वडेर: -**

" 'बारोमास'चा कॅनव्हॉसवर एक खेडं, त्या खेडयातलं एक कुटुंब, त्याची सुखदु:ख, निसर्गाची कृपा - अवकृपा या पार्श्वभूमीवर सदानंद देशमुखांनी एक सबंध गाव जिवंत केलं आहे.' "[५२]

**३. डॉ. भालचंद्र नेमाडे: -**

"शेती करणे हा मूर्ख लोकांचा धंदा झाला आहे हे पटवून देणाऱ्या अलीकडच्या दहा वर्षातील लेखनात 'बारोमास' सर्वात वर आहे. नोकरीसाठी मधुचा - साठेचा फसवाफसवीचा भागही ग्रेट! एकूण सगळयाकडून कुणब्याची नामुष्की झालेली तुम्ही उत्तम कथनशैलीत मांडली. अभिनंदन!"[५३]

**४. अपर्णा पाटील: -**

"सदानंद देशमुख यांची 'बारोमास' ही शेतकऱ्यांच्या जीवनावरची कादंबरी गेल्या दोन दशकात यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्याची जी धुळधाण उडाली, ती आपण पाहिली. सदानंद देशमुख यांच्या या कादंबरीत जागतिकीकरणाचे परिणाम, गॅटचे वारे, नव्या अर्थव्यवस्थेत शेतीचे झालेले अवमूल्यन यामुळे शेतकऱ्यांचे, गावांचे जे चित्र बदलले त्याचे चित्रण आले आहे."[५४]

कादंबरीचा आवाका मोठा असल्याने लेखकाने ग्रामीण भागातील समस्या व्यवस्थितरीत्या हाताळल्या आहेत, पण काही ठिकाणी कादंबरीत पाल्हाळीकपणा आला आहे. अंधश्रध्देचा प्रसंग, शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, व्यापारीकरण, जागतिकीकरण याविषयीच्या चर्चामध्ये पाल्हाळीकपणा जाणवतो. लेखक स्वत:च्याच मताला प्राधान्य देत आहे असेही वाटते. दिनकर दाभाडेच्या नोकरीविषयी शंका येते. येथे लेखकाने त्याला नोकरी राखीव जागेच्या आधारावर मिळाली असे नायकाच्या बोलण्यातून सूचित केले आहे. पण त्याचबरोबर प्राध्यापक होण्याची त्याची पात्रताही योग्य होती. ही गोष्ट लेखक विसरलेला दिसतो. याशिवाय नानूआजा, धुरपदाबाई, आणि अलका यांनी सुभानरावच्या घराला दिलेला शाप खरा ठरतो की काय ? असाही लेखकाने भास निर्माण केला आहे. त्यामुळे लेखक काहीसा अंधश्रध्देकडे झुकल्यासारखा वाटतो. या काही बाबी सोडल्या तर 'बारोमास' हे शीर्षकही समर्पक असेच आहे यात शंकाच नाही.

**समारोप: -**

विदर्भातील एका ग्रामीण कुटुंबाच्या माध्यमातून समकालीन समाजाचे, त्यांच्या व्यथा - वेदनांचे भयानक दर्शन घडविले आहे. 'बारोमास'या कादंबरीने मराठी आधुनिक ग्रामीण कादंबरीला नवे परिमाण दिले आहे. वैदर्भीय मातीचा गंध असलेली ही कादंबरी मन वेधून घेते. लेखकाने ग्रामीण जीवनाचे वास्तव निरीक्षण करून ग्रामीण भागातील समस्यांवर तीक्ष्णपणे नजर टाकून या ज्वलंत समस्या प्रखरपणे कादंबरीत मांडल्या आहेत. कादंबरीचा शेवट अस्वस्थ करणारा असून अंतर्मनात एक खळबळ उडवितो. चटकदार संवाद, लक्षणीय व्यक्तिरेखा, प्रसंगाला साजेल अशी वातावरणनिर्मिती, प्रवाही भाषाशैली, आकर्षक काव्य, विविध घटनांचे संक्षिप्त निवेदन इ. वैशिष्टयामुळे 'बारोमास' ही कादंबरी हृदयात घर करून राहते. अस्सल ग्रामीण जीवनाचा घेतलेला शोधच बोध देणारा आहे. सदानंद देशमुखांच्या लेखणीला ग्रामीण मातीचा गंध ठायी ठायी दरवळत आहे. ग्रामीण संस्कृती - परंपरेला प्राधान्य देऊन समाजाचे चित्र चित्रित केले आहे.

उपरोक्त प्रकरणातून आपण 'बारोमास' मधील सामाजिक व सांस्कृतिक जीवनदर्शनाचा, वाङ्मयीन श्रेष्ठत्वाचा आढावा घेतला. बारोमासमधून ग्रामीण समाजाचे वास्तव जीवनदर्शन रेखाटून समाजातील विषमतेवर अधिक परखडपणे लेखकाने भाष्य केलेले आहे. त्याचबरोबर लेखकाने आपला सांस्कृतिक वारसाही तितक्याच तन्मयतेने जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन मूल्यांच्या दृष्टीने 'बारोमास' ही कादंबरी निश्चितच यशस्वी झाली आहे असे दिसते.

## संदर्भ

१. देशमुख सदानंद, बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे. ४११०३०, द्वितीय आवृत्ती २००५, पृ. २०७.

२. तत्रैव, पृ. ५१.

३. तत्रैव, पृ. ९१.

४. तत्रैव, पृ. १९७.

५. तत्रैव.

६. तत्रैव, पृ. २८५ - २८६.

७. तत्रैव, पृ. ११४.

८. तत्रैव, पृ. ११८.

९. तत्रैव, पृ. ११९.

१०. तत्रैव, पृ. १४३.

११. बोजेवार श्रीकांत, मुंबई, लोकसत्ता - लोकरंग, रविवार १३ फेब्रु. २००५.

१२. देशमुख सदानंद, उनि. पृ. १०९.

१३. तत्रैव, पृ. १८७.

१४. तत्रैव, पृ. ८१ .

१५. तत्रैव, पृ. २०४.

१६. तत्रैव, पृ. २९६.

१७. तत्रैव, पृ. १२८.

१८. तत्रैव, पृ. १६५.

१९. तत्रैव, पृ. २२७.

२०. तत्रैव, पृ. २९५.

२१. तत्रैव, पृ. २६४.

२२. तत्रैव.

२३. तत्रैव.

२४. डॉ. वडेर प्रल्हाद, साप्ताहिक सकाळ, २२ जाने. २००५.

२५. अंतर्नाद, दिवाळी अंक, २००७ (संपा.) काळे भानू, 'मातीतून उगवलेला लेखक', सदानंद देशमुख यांची केशव देशमुख यांनी घेतलेली मुलाखत पृ.७६.

२६. साप्ताहिक सकाळ, २२ जाने. २००५, पृ. १९.

२७. हातकणंगलेकर म. द., साहित्यविवेक, प्रथमावृत्ती १९९७, पृ. १८३.

२८. डॉ. पाठारे रंगनाथ (संगमनेर), बारोमास, तृतीय आवृत्ती २००७ पृ. ३५१ वरून उध्दृत.

२९. डॉ. कानडजे एस. एम., उनि. पृ. ३५९ वरून उध्दृत.

३०. देशमुख सदानंद, उनि, पृ. १२८.

३१. तत्रैव, पृ. २३१.

३२. तत्रैव, पृ. ३१९.

३३. तत्रैव, पृ. १७.

३४. तत्रैव, पृ. २०८.

३५. तत्रैव, पृ. ११८.

३६. डॉ. वडेर प्रल्हाद, उनि.

३७. देशमुख सदानंद, उनि. पृ. २०२.

३८. तत्रैव, पृ. ५६.

३९. जाधव रा.ग., वाङ्मयीन निबंधलेखन स्वरूप आणि साधने, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे. प्रथमावृत्ती १९६७ पृ. ९१.

४०. देशमुख सदानंद, उनि. १४८.

४१. तत्रैव, पृ. २२७.

४२. देशमुख सदानंद, उनि.

४३. तत्रैव.

४४. तत्रैव.

४५. तत्रैव.

४६.तत्रैव.

४७.तत्रैव.

४८.तत्रैव, पृ. १९.

४९. तत्रैव, पृ. १८५.

५०.मनोहर अनंत, साहित्यसूची, जाने. २००४.

५१.प्रा. काळे मेधा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका क्र. ३१५, ऑक्टो. - नोव्हे. - डिसें. २००५, पृ. ३३.

५२.डॉ. वडेर प्रल्हाद, उनि. पृ. १९.

५३.डॉ. नेमाडे भालचंद्र, ३ जून २००३, मुंबई ६८.

५४. डॉ. पाटील अपर्णा, महाराष्ट्र टाईम्स, ६ ऑक्टो. २००२.

***********